पाक्षिक


# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई I वर्ष: 06 I अंक: 4 I 16 फेब्रुवारी 2024 I पृष्ठसंख्या: 36 I किंमत: 5 रू.



# गांव चलो अभियान







## अध्यक्षीय मनोगत

# निवडणुकीसाठी सज्ज व्हा

लोकसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. ही निवडणूक आपल्या पक्षाच्या नव्हे तर देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. २०४७ पर्यंत भारताला जगातील प्रमुख राष्ट्रांच्या बरोबरीने उभे करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. २०४७ पर्यंतचा कालखंड हा देशाच्या दृष्टीने 'अमृत काल' असेल, असे पंतप्रधानांनी अनेकदा सांगितले आहे. विकसित भारताचे संकल्प चित्र मोदीजींच्या मनात तयार आहे. हे संकल्प चित्र प्रत्यक्षात कसे आणायचे याचा आराखडाही मोदीजींनी तयार केला आहे. या वाटचालीतील महत्वाचे पाऊल म्हणजे देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्स एवढी करणे. त्यासाठी केवळ मुठभर वर्गाचा विकास होऊन चालणार नाही, तर समाजातील तळागाळातील घटकापर्यंत विकासाची फळे पोहचवली पाहिजेत, हे ओळखून मोदी सरकारने 'सर्वसमावेशक विकासासाठी' गेल्या १० वर्षात घेतलेले निर्णय आणि या निर्णयांचे परिणाम सर्वसामान्य माणूस अनुभवतो आहे. अनेक वर्षे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला पडलेल्या वंचित वर्गाला देशाच्या विकास प्रक्रियेतील आपला वाटा उचलण्यासाठी समर्थ केले जात आहे. म्हणूनच यावेळची लोकसभा निवडणूक आपल्या दृष्टीने प्रचंड महत्वाची आहे. कार्यकर्त्यांना या निवडणुकीसाठी सज्ज करताना पंतप्रधान मोदी यांनी आपला पक्ष ३७० पेक्षा अधिक जागा मिळवणार, असा विश्वास व्यक्त केला आहे. मोदीजींनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी तुम्हा-आम्हा कार्यकर्त्यांवर आहे. या निवडणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असलेले 'गांव चलो अभियान' नुकतेच संपन्न झाले. या अभियानाच्या निमित्ताने आपली संघटना खेडेगावातील सामान्य माणसापर्यंत जाऊन पोहचली. खेडी, वाड्या, वस्त्या येथपर्यंत पोहचून आपल्या संघटनेने या अभियानाचा उद्देश सार्थ ठरवला. काही दिवसांनी आचारसंहिता लागू होईल, निवडणुकीची प्रक्रिया सुरु होईल. अनेक संस्थांनी घेतलेल्या जनमत चाचण्यांमध्ये आपण ३३० पेक्षा अधिक जागा मिळवू, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हे अंदाज पाहून आपल्याला आनंद होणे साहजिक आहे, मात्र या आनंदाचे रूपांतर गाफिलपणात होता कामा नये. आपण निवडून येणारच आहोत, त्यामुळे आणखी प्रयत्न कशाला करायचे, असा विचार कार्यकर्त्यांच्या मनात येणे स्वाभाविक असते. मात्र असा गाफिलपणा दाखवणे आपल्याला परवडणारे नाही. संघटनेने आपल्याला एकूण मतदानाच्या ५१ टक्के मते मिळवण्याचे उद्दिष्ट दिले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिकाधिक मतदान करून घ्यावे लागणार आहे. त्यादृष्टीने आपल्या बूथ समित्यांवर मोठी जबाबदारी आली आहे. मतदार याद्यांचा सखोल अभ्यास करून आपल्या हक्काचे मतदान १०० टक्के झालेच पाहिजे, यासाठी बूथ पातळीवरच्या कार्यकर्त्यांना मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे. त्याचबरोबर मोदी सरकारच्या आणि राज्य सरकारच्या लाभार्थ्यांनीही १०० टक्के मतदान केले पाहिजे, याकडे तुम्हा-आम्हा सर्वांना लक्ष द्यावे लागणार आहे. मतदान संपेपर्यंत अन्य कोणताही विषय आपल्यासाठी महत्वाचा नाही. ५१ टक्के मते मिळवणे एवढेच ध्येय, प्रत्येक बूथ प्रमुखाने डोळ्यापुढे ठेवले पाहिजे.


**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




०४ संघटना सर्वोपरी


०६ विकासाचा निर्धार, विश्वासाचे नाते उलगडणारा मुक्काम


१४ आता तारीख नव्हे, न्याय मिळणार नव्या युगाचा प्रारंभ होणार...


१६ 'विकसित भारता'च्या स्वप्नाला गती देणारा अर्थसंकल्प


२३ महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी 15 हजार 544 कोटींची तरतूद


२५ 'महाविजया'ची तुतारी






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp 9767335402

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# संघटना सर्वोपरी




● **रवींद्र अनासपुरे**

> भारतीय जनता पार्टीने अलिकडेच राष्ट्रीय स्तरावर गांव चलो अभियान पार पाडले. हे अभियान अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण होते. पक्षाच्या सर्व नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधींनी, केंद्रात आणि राज्यात सत्तापदे भूषविणाऱ्या मंडळींनी बूथ पातळीवरच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहचून त्यांच्याशी संवाद साधावा, त्याचबरोबर त्या गावातील विविध थरातील नागरिकांशी (माजी सैनिक, माजी पोलीस, शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी) मोदी सरकारच्या कारभाराबाबत मोकळेपणाने संवाद साधावा, त्यांच्या केंद्र-राज्य सरकारबाबत अपेक्षा जाणून घ्यावात, असा व्यापक हेतू ठेवून या अभियानाची रचना करण्यात आली होती.

**सत्ता** स्थानावरील मंडळी सरकारी कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेपर्यंत जात असतात. अशा कार्यक्रमात नागरिकांची गाऱ्हाणी, तक्रारी ऐकण्यास पुरेसा वेळ मिळतो असे नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्य मंत्रिमंडळातील मंत्री हे पक्षाच्या मेळाव्यांना, अन्य कार्यक्रमांना उपस्थित असतात. अशा कार्यक्रमात मुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांना पदाधिकाऱ्यांबरोबर संवाद साधण्यास आवश्यक तो वेळ कार्यबाहुल्यामुळे देता येत नाही. त्यामुळेच सत्तापदे भूषविणाऱ्यांना थेट सामान्य माणसांपर्यंत आणि सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत जाता यावे, या उद्देशाने या अभियानाची रचना करण्यात आली होती. लोकप्रतिनिधी, सत्ताधीश, पक्षाचे पदाधिकारी हे सर्व पक्षामुळेच त्या पदापर्यंत गेले आहेत, हा विचार कोणीच विसरता कामा नये. आपल्या पक्षात वर्षांनुवर्षे फक्त कार्यकर्ता म्हणून काम केलेल्यांची संख्या प्रचंड आहे. पक्षाच्या विचारधारेवर निष्ठा ठेवून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबर पक्षाच्या नेत्यांना, लोकप्रतिनिधींना हितगुज साधण्याची संधी मिळणे, हा हेतूही या अभियानामागे होता.

पक्ष, सरकार आणि सामान्य माणूस, कार्यकर्ते यांच्यातला संवाद आणखी परिणामकारक व्हावा हा उद्देशही या अभियानामागे होता. त्यासाठी सर्व नेते, लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांना पक्षाने




सांगितलेल्या गावात मुक्काम करण्यास सांगितले गेले होते. पक्षाने दिलेल्या आदेशाप्रमाणे आपले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील मंत्री, सर्व प्रदेश पदाधिकारी, वेगवेगळ्या मोर्चाचे, आघाड्यांचे पदाधिकारी, खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचे सदस्य, नगरसेवक अशी सर्व मंडळी त्यांना नेमून दिलेल्या खेडेगावात मुक्कामाला गेली होती. शहरी भागात वॉर्ड निहाय हे अभियान राबवण्यात आले. अन्य पक्षांची आणि भारतीय जनता पार्टीची संस्कृती किती वेगळी आहे, हे या अभियानातून पुन्हा एकदा दिसले. नरेंद्र मोदी यांनी आपल्या पक्षाला कायम लोकाभिमुख ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. कोरोना संकटकाळात सर्व अर्थ व्यवहार ठप्प झाल्यामुळे हातावर पोट असलेल्या मजूर आणि श्रमिकांची उपासमार सुरू झाली होती. या वर्गाला मदत करण्यासाठी पक्ष कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरावे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले होते. त्यानुसार त्या संकटकाळात 'सेवा ही संघटन' हा उपक्रम देशभर राबवला गेला. पक्षाचे लाखो कार्यकर्ते कोरोनाच्या प्रादुर्भावाची पर्वा न करता रस्त्यावर उतरले आणि त्यांनी गोरगरिबांना, वृद्धांना तसेच अडचणीत सापडलेल्या समाजातील सर्व घटकांना अन्न-धान्यासह सर्व प्रकारची मदत केली. भारतीय जनता पार्टीचा जन्म सत्ताप्राप्तीसाठी झाला नसून जनतेची सेवा हेच आपले मुख्य ध्येय आहे, असे पंतप्रधान मोदी कायम सांगत असतात. 'गांव चलो अभियान' हे आपल्या सेवा ही संघटन या मंत्राच्या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अभियानात भाग घेताना पारडसिंगा या गावातील एका देवळात मुक्काम केला होता. सामान्य कार्यकर्ता हा पक्षाचा पाया आहे, त्यामुळे या अभियानात जनसंघापासून कार्यरत असलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या भेटी-गाठी हाही उपक्रम होता. देशासाठी हुतात्मा झालेल्या सैनिकांच्या, पोलिसांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांची विचारपूस करणे हाही या अभियानाचा भाग होता. हे अभियान आपल्या राज्यात संपूर्णपणे यशस्वी झाले. सर्व नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या मतदारसंघात, जिल्ह्यात पक्षाने सांगितलेल्या गावात हे अभियान राबवले. कार्यकर्ता, नेता, मंत्री, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी अशा सर्व पातळ्यांपर्यंत आपण हे अभियान यशस्वी केले. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी मुळशी तालुक्यातल्या जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. या विद्यार्थ्यांबरोबर बसून त्यांच्या शालेय पुस्तकांचे वाचन केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दुर्गम भागात जावून धनगर वस्तीला भेट दिली. मंत्रीपदाचे मोठेपण बाजूला ठेवून ही नेतेमंडळी सामान्य जनतेत मिसळली. भारतीय जनता पार्टीचे हेच वैशिष्ट्य आहे.

**(श्री.अनासपुरे हे प्रदेश मुख्यालय प्रभारी आहेत.)**

# विकासाचा निर्धार, विश्वासाचे नाते उलगडणारा मुक्काम




● वीरेंद्र जोगी

वडोदा (जि.नागपूर) या गावात तो गावात नवचेतना देणारा ठरला. निमित्त होते, भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या 'गाव चलो अभियानंतर्गत' प्रवासी कार्यकर्ता म्हणून मुक्कामाचे. २४ तासांत तब्बल १८ कार्यक्रम, जनतेशी संवाद, भेटी आणि विचारपूस करताना वडोदावासींच्या समस्याही बावनकुळे यांनी सहजतेने सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या दौऱ्याने गावकऱ्यांत नव्या उर्जेचा संचार झाला आहे. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्यावर असणाऱ्या गावकऱ्यांच्या स्नेहाने भारवलेले वातावरण, गावाच्या विकासाला नवे पैलू पाडणारा त्यांचा मुक्कामी प्रवास विश्वासाचे नाते उलगडणारा ठरला.

**महात्मा** गांधी यांनी १९४२ मध्ये करो या मरो या घोषणेनंतर क्रांतीच्या मशाली पेटल्या. लाल सेनेचे अध्यक्ष मगणलाल बागडी, भैय्याजी खराबे, सेलोकर गुरुजी, मनोहर पिंपळे यांच्यासह क्रांतीकारकांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या पावन स्मृतीला अभिवादन करून प्रदेशाध्यक्षांचा प्रवासी मुक्काम वडोद्यात सुरू झाला. युवकांनी बाईक रॅली काढून त्यांचे जोरदार स्वागत केले. गावातून जाणारी बाईक रॅली पाहण्यासाठी बालबच्च्यांसह महिला-पुरुषही रस्त्यावर आले होते. काहीतरी नवीन आणि चांगले घडणार हा आश्वासक आशावाद त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता. भवानी मंदिरात झालेली कामठी तालुक्यातील भाजपा सुपर वॉरियर्सची बैठक आणि त्यानंतरची टिफीन बैठक संघटनात्मक कार्याचे मार्गदर्शन आणि लाडक्या नेत्यासोबत स्नेहभोजनाचा आनंद मेळावाच ठरला. प्रदेशाध्यक्षांनी कार्यकर्त्यांना आस्थेने कुशलक्षेम विचारले. या सभेतून बाहेर



जाणारा कार्यकर्ता त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य घेऊनच परतला. वडोदा गावातील बाजार, गुजरी आणि दुकानातून फिरताना विक्रेत्यांशी संवाद साधला. मोदी सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली. रस्त्यालगत मोकळ्या जागेत राजमिस्त्री म्हणून काम करणाऱ्या दीपकच्या शेजारी बसून त्याच्या कामाची पद्धत श्री. बावनकुळे यांनी जाणून घेतली. विश्वकर्मा योजनेतून मोदी सरकार त्यांच्या व्यवसायाला वाढविण्यासाठी कर्ज देणार असल्याची माहिती दिल्यावर आपल्या व्यवसायाचा विचार करणारा कुणीतरी असल्याचे कृतार्थ भाव त्याच्या देहबोलीवरून जाणवत होता. शनिवारी सकाळी शाळेनंतर लवकर सुटी झाल्याने काही लहानगी मुले-मुली कबड्डीच्या मैदानावर खेळताना त्यांचे उत्साहवर्धन करण्यासाठी बावनकुळे उभे झाले. अन् एका बच्च्याने 'आमची मॅच बघा, तुम्हाला मज्ञा येईल' अशी हाक दिली. 'खेळा रे' असे म्हणत विजेत्यांना पुरस्कार देणार असे उत्तर दिल्यावर कबड्डीचा सामना रंगला. दोन्ही बाजूकडून पाटी टाकून विजयासाठी मुली-मुलेही सरसावली. मुलींचा संघ जिंकला. पुरस्कार मिळाल्यावर मुलीच्या संघाने मुलांच्या संघालाही पुरस्कार वाटून दिला. हे पाहून बावनकुळेंनी मुलींच्या पाठिवर कौतुकाची थाप दिली.

प्रदेश अध्यक्षांनी गावातील अनेकांच्या भेटी-गाठी घेतल्या. ज्येष्ठांचा सत्कार केला. सरकारी योजनेत त्यांच्या नावाचा समावेश असल्याची खात्रीही करून घेतली. ज्येष्ठांचा सत्कार त्यांच्यासाठी सन्मानाची पर्वणी ठरणारा होता. यातच एका वृद्धाच्या नातवाला पुस्तकांसाठी लागणारा खर्च करण्यासाठी बावनकुळेंनी गावातील युवा कार्यकर्त्यांना थोडा हातभार लावण्यास सांगितले. 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' ही म्हणच या निमित्ताने त्यांच्या एका आवाहनाने सार्थरूपात आली. प्रगतीशील शेतकऱ्यांचा सन्मान केला. दरम्यान त्यांनी एका शेतकऱ्याच्या ट्रॅक्टरवरून प्रवास केला व तो चालवूनही पाहिला. 'गावाकडे चला' गावातल्या लहान-लहान गोष्टीतही आनंद मिळविता येतो हेच त्यांच्या कृतीतून दिसले.

संत जगनाडे महाराज सभागृहात महिलांशी संवाद साधताना त्यांनी मोदी सरकारच्या योजनांच्या अग्रस्थानी महिला सशक्तिकरणाचा उल्लेख केला. मोदीजींनी सांगितलेल्या विकासाच्या चार स्तंभात पहिला स्तंभच नारीशक्तीचा आहे. स्त्री ही घराची संरक्षक असल्याचाही दाखला दिला. बावनकुळे यांच्या दिवसभराच्या कामाचा धडका पाहून रात्री झालेल्या जनसभेत गावाचे सरपंच राजू थोटे व लगतच्या केशोरी-अंबाडीचे सरपंच प्रकाश महाकाळकर यांनी आपण भाजपात प्रवेश करणार असल्याचे जाहीर करून गावकऱ्यांना सुखद धक्काच दिला. तीन वेळा कामठीचे लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना विकासात कोणताही पक्षपात केला नाही. आवश्यक असणाऱ्या निधीसाठी आडकाठी केली नाही, त्याचमुळे भाजपाच्या विचारासोबत जाण्याचा निर्धार केल्याचे मत या सरपंचांनी मांडले. या पक्षप्रवेशाने श्री. बावनकुळे यांचा लोभस सर्वसमावेशकपणा अधोरेखित झाला. रात्री मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशी (रविवारी) सकाळी साडेसहा वाजता गावात स्वच्छता अभियान व त्यानंतर शिवाजी महाराज चौकातील ग्रामपंचायतसमोरच्या कट्ट्यावर गावकऱ्यांशी गप्पाचा फड रंगला. गावातील एक दिवस कसा निघून गेला, हे त्यांना आणि गावकऱ्यांना कळलेच नाही. या गावात वारंवार येण्याची कबुली त्यांनी गावकऱ्यांना दिली.

गावकऱ्यांचा स्नेह व कायमचा लोभ राहू द्यावा, अशी विनंती करून त्यांनी गावाचा निरोप घेतला. त्यांच्या या प्रवासात आमदार टेकचंद सावरकर, जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, रामटेक लोकसभा निवडणूक प्रमुख अरविंद गजभिये, प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव पोतदार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. ■



**पारडसिंगा (ता.काटोल, जि.नागपूर)- उपस्थिती-** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा. कृपाल तुमाने, डॉ. आशिष देशमुख, नागपूर जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, डॉ.राजीव पोतदार आदी.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पारडसिंगा येथे सामान्य नागरिकांच्या भेटी घेऊन संवाद साधला.



वडोदा (जि.नागपूर) येथील मुक्कामात प्रदेश अध्यक्ष श्री. बावनकुळे यांनी ट्रॅक्टर चालवला.





**छत्रपती संभाजीनगर (पूर्व)– उपस्थिती–** केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, शहराध्यक्ष शिरीष बोराळकर आदी.



**नाणेगाव (ता.मुळशी, जि.पुणे)– उपस्थिती–** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी आमदार शरद ढमाले, वैशाली सणस, विनायक ठोंबरे, प्रमिला शेडगे, गणेश सातव, कल्याणी सातपुते, सारिका भिंताडे आदी.





**केसरी(जि. सिंधुदुर्ग)– धनगरवाडीला भेट– उपस्थिती–** सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, माजी आमदार राजन तेली, पंचायत समिती सदस्य संदीप गावडे, रवी मडगावकर, सरपंच स्नेहल कासले, उपसरपंच संदीप पाटील, भिवा सावंत, भरत गोरे, दीपक पाटील, संदीप लांबर, श्रीकृष्ण सावंत, सुनिता गावडे, दीपाली गोरे, संतोष कोकरे, महेश सावंत आदी.



**सोलापूर- उपस्थिती-** आ.सुभाष देशमुख, ज्येष्ठ कार्यकर्ते हेमंत स्वामी, मळसिद्ध मुगळे, शशिकांत दुपारगुडे, मल्लिकार्जुन नंदर्गी, गौरीशंकर मेंडगुदले, प्रशांत कडते, शामराव हांडे आदी.



**सावेडी (नगर)- उपस्थिती-** आ. प्रा. राम शिंदे, महानगर अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, महेश तवले, प्रिया जानवे, रेणुका करंदीकर, नितीन शेलार, संपत नलावडे, चिन्मय पंडित, मयूर बोचुघोळ, बाळासाहेब गायकवाड, रामदास आंधळे आदी.



**पिशवी (जि. कोल्हापूर)- उपस्थिती-** प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, जिल्हा सरचिटणीस शहाजी भोसले, सरपंच विनायक पाटील, माजी उपसरपंच नामदेव पाटील, तालुकाध्यक्ष पांडुरंग वग्रे, विजय रेडेकर, संजय खोत, राजेंद्र पाटील, संजय नागुरे, रमाताई फाटक.



**अक्कलकोट- उपस्थिती-** जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, मोतीराम राठोड, अप्पू परमशेट्टी, महेश पाटील, अतुल मेलकुंडे, शंकर भांजी, हनमंत कलशेट्टी, बाबा टक्कळकी, जगन्नाथ जाधव, भीमा अंदेनी, मांतेश बिराजदार, मंजुनाथ दैनक आदी.



**अहमदनगर- उपस्थिती-** लोकसभा निवडणुक प्रमुख बाबासाहेब वाकळे, ज्येष्ठ नेते मधुसूदन मुळे, वसंत लोढा, सचिन पारखी, प्रशांत मुर्था, नितीन शेलार, किशोर वाकळे, विवेक नाईक, प्रिया जानवे, रवींद्र बारस्कर, उदय अनुभुळे, पुष्कर कुलकर्णी, निलेश जाधव, राजू मंगलाराप, कालिंदू केसकर आदी.



**लखनवाडा (जि.बुलढाणा)- उपस्थिती-** प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य डॉ. पंकज भिवटे, माजी सरपंच पांडुरंग भिवटे, भटके विमुक्त आघाडीचे बाळू पांढरे, राजू पांढरे, गजानन भिवटे, डॉ.गुफरान हटकर, ओम पांढरे, अन्सार शेख आदी.



**माळेगाव (ता. बारामती, जि.पुणे)- उपस्थिती-** प्रमोद तावरे, अशोक सस्ते, अनिल लोणकर, कल्याण बागल, गौरव भुंजे आदी.



**पाथर्डी (जि. अहमदनगर)– उपस्थिती–** आ.मोनिका राजळे, नारायण पालवे, गंगाधर गर्जे, उद्धव माने, हरिभाऊ धायतडक, बाबासाहेब गर्जे, संभाजी गर्जे, नवनाथ धायतडक, हर्षद गर्जे, अक्षय दातीर आदी.



**सोलापूर– उपस्थिती–** शहराध्यक्ष नरेंद्र काळे, ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नु, अंबादास बिंगी, नागनाथ सोमा, रवींद्र नक्का, भूपती कमटम, नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, अनिल कंदलगी, गिरीश बत्तूल, मेघनाथ येमुल, आनंद बिरू, दत्तात्रय पोसा, श्रीनिवास जोगी, दत्ता पाटील, प्रकाश म्हंता आदी.



**वार (जि.धुळे)– उपस्थिती–** पदवीधर प्रकोष्ठ प्रदेश संयोजक धनराज विसपुते, दादासो भदाणे, रवींद्र निकम, दिलीप पाटील, अनिल पाटील, बापू पाटील, नानाभाऊ गिरासे, पुंडलिक पाटील, सचिन बिराटी, मनोज वाघ, मनोज माळी आदी.



**परभणी महानगर– उपस्थिती–** महानगर सरचिटणीस भिमराव वायवळ, रितेश जैन, महानगर सरचिटणीस संजय रिझवानी, नगराध्यक्ष कमलकिशोर अग्रवाल, जिल्हा उपाध्यक्ष उमेश शेळके, सुप्रिया कुलकर्णी, सुप्रिया मांडे, विजया कातकडे, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष मुकेश गाढे, महानगर चिटणीस संजय शामर्थी, युवा मोर्चा प्रदेश चिटणीस नागसेन पुंडगे, बाळासाहेब राजुरकर, रविकुमार गोरे, शिवरूद्र सालमोटे, अल्पसंख्यांक मंडल अध्यक्ष अब्दुल खान, युवराज गोरे, सुनिल बरवे, मनोज पोरवाल, मंडलाध्यक्ष भालचंद्र गोरे आदी.



**आरळी खुर्द (जि. धाराशिव)– उपस्थिती–** जिल्हा चिटणीस साहेबराव घुगे, गणेश पारवे, ज्येष्ठ कार्यकर्ते दत्तोबा कोळी, राम सोमवंशी, अस्लम पठाण, विठ्ठल मोहिते, अजय पारवे, युवराज सुतार, गुंडाप्पा गायकवाड, सतिश मोहिते आदी.



**वरणगाव (जि.जळगाव)– उपस्थिती–** जिल्हाध्यक्ष अमोल जावळे, ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक श्रीखंडे, चुडामन धनगर, दत्तोपंत मराठे, जिल्हा उपाध्यक्ष सुनील काळे, परीक्षीत बऱ्हाटे, सुनील माळी, बळीराम सोनवणे, डॉ.सादिक शेख, मनोहर सराफ, योगेश माळी, गंभीर माळी.



**लोणी (जि.यवतमाळ)– उपस्थिती–** राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, एन.टी.जाधव, विपीन राठोड, किशोर बावने, किसन राठोड, दिलीप मादेसवार, विशाल देशमुख, बाळासाहेब चावरे, रमेश चौव्हाण, राजेश माहेश्वरी, सुरेश चिल्लरवार, प्रमोद आडे, भाऊसाहेब आत्रे आदी.



**जळगाव– उपस्थिती–** आ.सुरेश भोळे, जिल्हा सरचिटणीस महेश जोशी, जिल्हा उपाध्यक्ष राहुल वाघ, मंडल अध्यक्ष महेश कापुरे, मिलिंद वाढे, बूथ प्रमुख पंकज सोनार, ललित बडगुजर आदी.

**गोंदिया– उपस्थिती–** महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष शालिनी डोंगरे, धर्मिष्ठा सेंगर, तुमेश्र्वरी बघेले, सीता रहांगडाले, चित्रकला चौधरी, सोनाली देशपांडे, रजनी धपाडे आदी.





**सोलापूर–बूथ नंबर २३९,२५७– उपस्थिती–** प्रसाद कुलकर्णी, देविदास चेळेकर, माजी नगरसेवक अमर पुदाले, प्रकाश पाटील, जगदीश पाटील, विजय गवई, श्रीशैल मेंडके, उमेश डोइजोडे, गणेश गवई, अभिषेक पुजारी, महेश जोशी, सुभाष नरोटे आदी.



**कोंडानगर (जि.सोलापूर)– उपस्थिती–** विजय इप्पाकायल, पद्मा द्यावनपल्ली, वनिता सुरम, मलेश गाडी, व्यंकटेश बुरा आदी.




**भंडीशेगाव (जि.सोलापूर)– उपस्थिती–** माजी आमदार प्रशांत परिचारक, सरपंच मनीषा येलमार, पंचायत समिती सदस्य पल्लवी येलमार, श्रीधर यलमार, गंगाराम विभुते, महेंद्र येलपले, अशोक येलमार आदी.



**अहमदपूर–चाकुर– उपस्थिती–** प्रदेश प्रवक्ते तथा विधानसभा प्रमुख गणेश हाके–पाटील, गोविंदराव गिरी, माणिकराव नरवटे, सरपंच हरिभाऊ सोडगीर, देवकत्ते मामा, मौलासाहब शेख, तुकाराम देवकत्ते, दस्तगीर शेख, बालाजीराव देवकत्ते, हरिश्चंद्र जाभाडे, केशवराव खटके, ईश्वर देवकत्ते, नानासाहेब नरवटे आदी.



**नंदेश्वर (जि.सोलापूर)– उपस्थिती–** ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विवेक खिलारे, बापू मेटकरी, भारत माळाप्पा, सचिन गरंडे, तुकाराम करे, अनिल बंडू, बंडू कळकुंबे, सुरज करे, जयंत लवटे, नवनाथ कुंभार, अनिल गरंडे, अमोल सौदागर, संतोष शिंदे आदी.




**चांदज (जि.सोलापूर)– उपस्थिती–** किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब वावरे, ओबीसी तालुकाध्यक्ष निवृत्ती तांबवे आदी.



**नागपूर– ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार– उपस्थिती–** पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त जनसंघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. प्रभाकरराव बेलेकर प्रभाकर अडकीने, धनराज साखरकर, श्रीमती विमलताई बोरीकर यांचा सत्कार करण्यात आला.

# आता तारीख नव्हे, न्याय मिळणार
# नव्या युगाचा प्रारंभ होणार...



> स्वातंत्र्याच्या शताब्दी महोत्सवापर्यंत म्हणजेच २०४७ पर्यंत देशातील इंग्रजांच्या सर्व पाऊलखुणा नष्ट करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा आहे. त्याचेच पुढचे पाऊल म्हणजे तीन फौजदारी कायदे नुकतेच संसदेत मंजूर झाले. या कायद्यांमुळे दंडांऐवजी न्याय देण्यावर अधिक भर असेल, तसेच एखाद्या प्रकरणाच्या निकालामध्ये पीडितेचीही सहमती घेतली जाईल.

**जम्मू-काश्मीरमधून** कलम-३७० हटविल्यानंतर नव्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही प्रयत्नरत असल्याचे केंद्रीय गृहमंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी सांगितले. शाह यांनी 'लोकमत' माध्यम समूहाला दिलेल्या मुलाखतीत विविध मुद्द्यांवर भाष्य केले. केंद्रातील मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात गृहमंत्री अमित शाह एक आक्रमक मंत्री म्हणून ओळखले जातात. ते जितक्या आत्मविश्वासाने संसदेत आपली भूमिका मांडतात, तितक्याच दृढनिश्चयाने त्याची अंमलबजावणी करतात. संसदेच्या मागील अधिवेशनात भारतीय दंड विधानाऐवजी भारतीय न्याय संहिता आणल्याबद्दल त्यांच्यावर अनेकांनी टीका केली, मात्र प्रत्येक टीकेला ते तथ्य आणि तर्काने उत्तर देतात आणि हा बदल योग्य असल्याचे सिद्ध करतात. या नव्या कायद्यांसदर्भात चर्चा करताना देशातील राजकीय परिस्थितीवर नवी दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी सुमारे एक तास संवाद झाला. पांढरा कुर्ता-पायजमा आणि हिरव्या रंगाच्या चेक्सचे जॅकेट परिधान केलेले गृहमंत्री शाह यांच्या चेहऱ्यावरचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. दिवसभर व्यग्र असूनही नव्या आणि परिवर्तनवादी कामातून त्यांना मिळणारी प्रेरणा दिसत होती. गृहमंत्री अमित शाह यांच्याशी 'लोकमत' समूहाचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक आणि संपादकीय संचालक ऋषी दर्डा आणि नॅशनल एडिटर हरीश गुप्ता यांनी साधलेला संवाद.

**प्रश्न: तीन नवे फौजदारी कायदे संसदेत मंजूर करण्यात आले, त्याकडे कायदा-व्यवस्थेतील एक 'टर्निंग पॉइंट' आणि 'गेम चेंजर' म्हणून पाहिले जात आहे.**

**उत्तर:** मी याला 'गेम चेंजर'पेक्षाही भारताच्या न्यायव्यवस्थेतील नव्या युगाची सुरुवात मानतो. कारण १५० वर्षे आपला देश इंग्रजांनी तयार केलेल्या न्यायव्यवस्थेनुसार चालला. मात्र जोपर्यंत इंग्रजांचे सरकार होते, तोपर्यंत ते ठीक होते. त्यांच्या संसदेने कायदा बनवला आणि आपण त्याचे पालन केले. परंतु, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपले सरकार आल्यावरही, १८६० ते १८७५ दरम्यान तयार करण्यात आलेलेच कायदे कायम राहिले. वास्तविक, त्या कायद्यांचा हेतू इंग्रजांची सत्ता टिकवणे हा होता. ते लोकांना न्याय देण्यासाठी नव्हते.

**प्रश्न: यामुळे काय बदल होतील?**

**उत्तर:** कोणत्याही सभ्य समाजात न्यायप्रक्रिया तयार करण्यासाठी हे आवश्यक आहे की, त्या समाजात सगळ्यात मोठा गुन्हा कोणता आहे हे निश्चित करणे. आजच्या संदर्भात पाहायचे किंवा अगदी दीडशे वर्षांच्या संदर्भाने बघितले तरी मानव हत्या हा सगळ्यात मोठा गुन्हा

होता. तो इंडियन पिनल कोडमध्ये ३०२ क्रमांकावर होता. ही त्यावेळची प्राथमिकता होती. मात्र, आजच्या काळाचा विचार करायचा तर, महिला आणि लहान बालकांवरील अत्याचारानंतर मानव हत्या हा सर्वांत मोठा गुन्हा आहे. परंतु, त्यांचा नंबर कलम ३०२, ३६७ असा होता. त्याच्यापेक्षा वर काय होते? संपत्ती लुटणे, राजद्रोह, रेल्वेचे रूळ उखडणे, रेल्वेच्या संपत्तीचे नुकसान करणे, सरकारी अधिकाऱ्याच्या विरोधात कृत्य करणे, यासारख्या कलमांचा समावेश होता. यावेळी पहिल्यांदाच आपल्या संविधानाच्या भावनेनुसार, प्रत्येक व्यक्तीसाठी समान न्याय, संविधानाने दिलेल्या अधिकारांचे संरक्षण करणारे कायदे तयार करण्यात आले. म्हणून हे युग परिवर्तन घडवणाऱ्या कायद्यांचे ठरणार आहे.

**प्रश्न: आपण बरोबर बोलत आहात, मात्र न्याय केव्हा मिळतो? खटले चालूच राहतात. प्रत्यक्षात किती लोकांना शिक्षा होते?**

**उत्तर:** स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर आपण पहिल्यांदाच भारतीय न्याय व्यवस्थेनुसार काम करणार आहोत. २०४७ पर्यंत गुलामीच्या सर्व खुणा मिटवणे आणि आपल्या संस्कृतीच्या आधारे नवे कायदे बनवणे, हे मोदीजींनी देशासमोर ठेवलेले खूप मोठे लक्ष्य आहे आणि हे नवे कायदे ही त्याचीच सुरुवात आहे. जुन्या कायद्यांचा पूर्ण भर हा शिक्षा देण्यावर होता, मात्र नवीन कायद्यांचा उद्देश हा न्याय देणे असा आहे. अनेक लोकांनी न्यायाबाबत लिहिले आहे. नारदांपासून याज्ञवल्क, कल्पपासून कौटिल्यांपर्यंत अनेकांनी न्यायाबावत लिहून ठेवले आहे. आता दंड, शिक्षा याऐवजी न्यायाला केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. एखाद्या व्यक्तीला शिक्षा का द्यावी?, तर समाजातील अन्य व्यक्तींनी उदाहरणाकडे पाहून गुन्हा करू नये मात्र मूळ भावना ही व्यक्तीला मिळणाऱ्या न्यायाची आहे. हा खूप मोठा फरक आहे. आम्ही कायद्याच्या आत्याला भारतीय केले असून संविधानाच्या दृष्टीने कायद्याची प्राथमिकता बदलली आहे. जाम्ही शिक्षेच्या जागी न्यायाला स्थापित करत मूळ भारतीय न्याय विचारांप्रमाणे 'जस्टिस सेंट्रिक' कायदे तयार केले आहेत. जगभरात जवळपास तीन न्यायव्यवस्था आहेत. गुन्हेगारी कायदा लेटिन, आयरिश आहे. भारतीय न्यायव्यवस्थाही आहे. आपण आतापर्यंत आयरिश न्याय व्यवस्थेनुसार नियंत्रित होत राहिलो आहोत

**प्रश्न: आज तर तारखांवर तारखा मिळतात, मग निकालाचे काय?**

**उत्तर:** जो वेळवर मिळतो, तोच खरा न्याय असतो. १५० वर्षे जुन्या कायद्यांमध्ये कुठेही वेळेवर न्याय मिळण्याबाबतची तरतूद नव्हती. आम्ही वेळेवर न्याय मिळण्यासाठी दोन प्रकारच्या तरतुदी केल्या आहेत. पहिली म्हणजे, आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर केला आहे, ज्यामुळे न्याय मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होईल. दुसरी म्हणजे, आम्ही पोलिस अर्थात तपास, वकील आणि न्यायाधीश या तीनही स्तरांसाठी ३५ कलमांमध्ये वेळ मर्यादा निश्चित केली आहे. आता तपास १८० दिवसांहून अधिक ताणता येणार नाही. आता तुम्हाला 'फायनल चार्ज शीट' न्यायालयात ठेवावीच लागेल. 'फायनल चार्ज शीट' आल्यानंतर अमुक दिवसांत 'एक्नॉलेज' करायचे आहे, अमुक दिवसांत सुनावणी सुरू करायची आहे. तसेच निकाल राखून ठेवल्यानंतर ३० दिवसांत तुम्हाला तो निकाल द्यावा लागणार आहे. आता तंत्रज्ञानाच्या आधारे आणि कायदेशीर तरतुदींच्या आधारे वेळेवर न्याय मिळेल. हा कायदा पूर्णपणे लागू झाल्यानंतर तो जगातील सर्वांत आधुनिक आणि तंत्रज्ञानाने युक्त असा कायदा ठरणार आहे, ही सगळ्यात मोठी गोष्ट आहे.

**प्रश्न: काही अधिकारी कर्मचारी कार्यालयीन कामामध्ये व्यग्र असल्याने न्यायालयात जात नाहीत. त्यामुळेही निकालाला विलंब होतो. त्यासाठीही काही तांत्रिक सुधारणा करण्यात आली आहे का?**

**उत्तर:** आगामी १०० वर्षांत विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाचा विचार करून आम्ही नवे कायदे केले आहेत. सध्या एखाद्या अधिकाऱ्याला कोर्टात यावे लागले तर दिवसभर कोर्टात बसून राहावे लागते. त्याचे नाव येणार की नाही, पुढील तारीख केव्हा मिळेल, हे सांगता येत नाही. कोर्टाचे वातावरणही वैज्ञानिकांना चांगले वाटत नाही, शवविच्छेदन करणाऱ्या डॉक्टरांना, बँकेच्या अधिकाऱ्यांनाही हे वातावरण रुचत नाही. त्यामुळे ते कोर्टात येणे टाळतात आणि तारखा पडत राहतात. त्यामुळे आता ऑनलाइन साक्ष नोंदवण्याचे आम्ही निश्चित केले आहे. साक्षीदार किंवा एखाद्या अधिकाऱ्याला कोर्टात येण्याची आवश्यकता नाही. कैद्यालाही कोर्टात आणले जाणार नाही. तुरुंगातून ऑनलाइन सुनावणी केली जाईल. **(दै.लोकमतमध्ये प्रसिद्ध झालेली मुलाखत)**

# ‘विकसित भारता’च्या स्वप्नाला गती देणारा अर्थसंकल्प



● डॉ. भागवत कराड, केंद्रीय अर्थराज्यमंत्री

> विकासाची दिशा सांगणारा पण त्याच वेळी आर्थिक शिस्त पाळणारा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे विकसित भारताचा रोडमॅप पूर्णकालीन अर्थसंकल्पातून येईल, असा आत्मविश्वास देणारा हा अर्थसंकल्प आहे.

**केंद्रीय** अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांच्यासह मी १ फेब्रुवारी २०२४ रोजी बहुप्रतीक्षित अर्थसंकल्प सादर केला. अर्थसंकल्पात विविध क्षेत्रांतील महत्त्वाकांक्षी योजना आणि निधीवाटपाचा समन्वय साधण्यात आला. सामाजिक आणि विकासात्मक गरजा पूर्ण करताना आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी तयार केलेल्या या अर्थसंकल्पात गृहनिर्माण, शाश्वत विकास, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, आरोग्य, कृषी आणि इतर अनेक क्षेत्रांसाठी महत्त्वपूर्ण तरतुदी आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासदृष्टीचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात पडले असून, २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र व्हावे, याची पायाभरणी या अर्थसंकल्पाने केली आहे.

सरकार मध्यमवर्गीयांसाठी घरांची योजना सुरू करणार आहे. मध्यमवर्गीयांना स्वतःची घरे खरेदी करण्यासाठी किंवा बांधण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा या योजनेमागचा उद्देश आहे. शिवाय प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) तीन कोटी घरांच्या सुरुवातीच्या उद्दिष्टाच्या जवळ जाणारी आहे. पुढील पाच वर्षांमध्ये २ कोटी घरे बांधण्याचे अतिरिक्त उद्दिष्ट आहे, ज्यामुळे परवडणाऱ्या घरांच्या उपक्रमांना आणखी चालना मिळेल. विकसित भारताच्या ‘व्हिजन’ला चालना देत ५० वर्षांपेक्षा अधिक काळ व्याजमुक्त कर्जाच्या स्वरूपात १.३ लाख कोटींचे भरीव वाटप राज्यांना केले जाईल. सरकारच्या भांडवली खर्चात ११ टक्के वाढ झाली आहे. पायाभूत सुविधा आणि विकास









प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याची वचनबद्धता त्यामागे आहे. आयकर परतावा प्रक्रियेच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा करण्यात आल्या आहेत. २०१३-१४ मध्ये या प्रक्रियेला लागणारा सरासरी ९३ दिवसांचा कालावधी कमी करून २०२३-२४ मध्ये तो फक्त १० दिवसांवर आणला गेला आहे.

या अर्थसंकल्पात १ कोटी कुटुंबांना घरांवर सौरऊर्जा संच लावण्यासाठी सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, या योजनेतून दरमहा ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळेल. पायाभूत सुविधांचा विकास आणि गुंतवणुकीवर लक्षणीय भर देण्यात आला आहे. मालवाहतुकीतील कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि खर्च कमी करण्यासाठी पीएम गतिशक्तीअंतर्गत तीन प्रमुख रेल्वे कॉरिडॉर कार्यक्रम राबविण्यात येतील. पुढील आर्थिक वर्षासाठी भांडवली खर्चात ११.१ टक्के वाढ करण्याबरोबरच ४०,००० रेल्वे डब्यांना 'वंदे भारत' मानकांमध्ये रुपांतरित केले जाईल. उडान योजनेंतर्गत विद्यमान विमानतळांचा विस्तार आणि नवीन विमानतळ विकसित करण्यात येतील. उदयोन्मुख उद्योगक्षेत्रांना दीर्घकालीन वित्तपुरवठा, नवकल्पना आणि तांत्रिक प्रगतीला चालना देण्यासाठी ५० वर्षांहून अधिक कालावधीचे व्याजमुक्त कर्ज देण्यासाठी १ लाख कोटी रुपयांचा निधी दिला जाईल.

९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग प्रतिबंधक लसीकरणाचा प्रचार करण्यात येणार आहे. चिमुकल्यांची काळजी घेण्यासाठी सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० सारख्या कार्यक्रमांना गती देण्यात येणार आहे. आयुष्मान भारत योजनेंतर्गत आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचा समावेश करून सर्वांसाठी सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येतील. विविध कृषी-हवामान झोनमध्ये नॅनो-डीएपीचा विस्तार, आत्मनिर्भर तेलबीज धोरण, मत्स्यपालनात वाढ, अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना देण्याच्या उद्देशाने मायक्रो फूड प्रोसेसिंग एंटरप्रायझेस योजना, आदी उद्दिष्टे शेतीसाठी महत्त्वाची ठरतील.

अर्थसंकल्पात संरक्षण, वाहतूक, कृषी आणि ग्रामीण विकास यासाठी भरीव निधीची तरतूद केली गेली आहे. या अर्थसंकल्पाद्वारे अर्थमंत्री सीतारामण यांनी सर्वसमावेशक वाढ, शाश्वत विकास आणि तांत्रिक नवकल्पना यांचा भक्कम पाया रचला आहे. २०४७ पर्यंत भारताच्या सर्वांगीण विकासासाठी विकसित राष्ट्र म्हणून योजलेला हा अर्थसंकल्प होय!

सामाजिक आणि विकासात्मक आव्हानांना तोंड देताना भारताला जागतिक आर्थिक शक्तिस्थान बनवण्याचे या अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'व्हिजन' प्रत्यक्षात आणण्यात हा अर्थसंकल्प मोलाचे योगदान देईल, यात शंका नाही. **(सौजन्य: दै.लोकसत्ता)**

# संकल्पपूर्तीच्या वाटेवरचे पाऊल...

● देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

> ‘सबका साथ-सबका विकास’पासून सुरू झालेल्या प्रवासात ‘सबका विश्वास’ हे सूत्र जोडले गेले आणि त्यातून देशाने खऱ्या अर्थाने विकसित भारताकडे अतिशय झपाट्याने झेप घेणे प्रारंभ केले.

गेली १० वर्षे जो प्रचंड विश्वास या देशातील सामान्य नागरिकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर दाखविला, तो कमालीचा आहे. या देशात एक असा नेता आहे, जो जनतेचा विकास करतानाच, पर्यायाने राष्ट्र परमवैभवाकडे नेऊ शकतो, हे लोकांच्या लक्षात यायला लागले आणि निवडणुकांगणिक लोकांचा विश्वास अधिक बळावत गेला. मोजके पत्रपंडित सोडून आता देशवासीयांना हे कळून चुकले आहे की, होय आपण विकसित भारताकडे झेप घेऊ शकतो. त्याच अर्थाने मी म्हणेन की हा विकसित भारताचा संकल्प सांगणारा अर्थसंकल्प आहे. अर्थात गरीब कल्याणातूनच राष्ट्रकल्याण वेगाने होऊ शकते, हे त्यामागचे मोदी सरकारचे कार्यसूत्र आहे.

केवळ डीबीटीतून (थेट लाभ हस्तांतरण) २.७ लाख कोटी या देशाच्या तिजोरीतून दलालांच्या हाती जाण्यापासून वाचले आहेत. त्याच पैशातून गरिबांसाठीच्या अनेक योजना मोदी सरकारला राबविता आल्या आणि २५ कोटी लोक गरिबी रेषेतून बाहेर आले. रस्त्यावर, फुटपाथवर व्यवसाय करणाऱ्या ७८ लाख लोकांना कर्ज, १.४ कोटी युवकांना कौशल्य प्रशिक्षण, ११.८ कोटी शेतकऱ्यांना पीएम-किसान (ज्या योजनेत आपण महाराष्ट्रात आणखी ६००० रुपये वार्षिक देतो.), चार कोटी शेतकऱ्यांना पीकविमा, उच्चशिक्षणात २८ टक्के महिलांचा वाढलेला टक्का, एक कोटी महिला बचत गटांच्या माध्यमातून लखपती होणे, तीन कोटी लोकांना मालकी हक्काचे घर, देशात रस्ते, रेल्वेचे विस्तारलेले जाळे ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे. पत्रपंडित धोरणांना शब्दबंबाळ करू शकतात, पण, वास्तविकतेवर चर्चा करू शकत नाहीत, हीच या सरकारची फार मोठी कामगिरी आहे.

आज महाराष्ट्रात आपण हरित ऊर्जा क्षेत्रात फार मोठे काम करतो आहे. परवाच आपण २.७० लाख कोटींचे करारसुद्धा केले. मला आनंद आहे की या अर्थसंकल्पात राष्ट्रीय हरित डायड्रोजन मिशनवरील तरतूद दुप्पट करण्यात आली आहे. सौर ऊर्जेसाठीची तरतूदसुद्धा दुप्पट करण्यात आली आहे. एक कोटी कुटुंबांना सोलर यंत्रणा देऊन ३०० युनिटपर्यंत वीज मोफत देण्याचा संकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सेमिकंडक्टर क्षेत्रात संशोधनाला चालना देण्यासाठी तरतूद दुप्पट करण्यात आली आहे.

या अंतरिम अर्थसंकल्पात विशेषत: महिला, शेतकरी, गरीब, युवा आणि मध्यमवर्गीय अशा सर्वच घटकांकडे विशेष लक्ष देण्याचा प्रयत्न झाला आहे. गरीब, चाळीत, झोपडपट्टीत राहणारे, मध्यमवर्गीय यांना स्वत:चे घर घेण्यासाठी योजना तयार करण्यात येणार आहे. एक लाख कोटी रुपयांचा व्याजमुक्त निधी तयार करून युवांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय तर अतिशय क्रांतिकारी आहे. यातून आमचे युवा हे मोठया प्रमाणात उद्यमी होतील. यातून संशोधनाला आणि स्टार्टअप परिसंस्थेला मोठी चालना मिळेल.

‘लखपती दीदी’ या कार्यक्रमातून तीन कोटी भगिनींना लखपती बनविण्याचा संकल्पही करण्यात आला आहे. नऊ कोटी महिलांना महिला बचत गटांच्या माध्यमातून अर्थकारणाच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न आहे. ११ लाख कोटींची गुंतवणूक रस्ते, रेल्वे, पायाभूत सुविधांसाठी करण्यात येते आहे. यातून विकासाला मोठी चालना मिळेल. या गुंतवणुकीतून एकीकडे पायाभूत सुविधा निर्माण होत असताना रोजगारातही वृद्धी होणार आहे. शेतकऱ्यांसाठी नॅनो डीएपी ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव आणि थेट बाजारपेठेशी जोडणी यासाठीच्या विविध योजनांचा ऊहापोह या अंतरिम अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे.

**(सौजन्य: दै.लोकसत्ता)**

# अर्थसंकल्पातून भविष्याची मुहूर्तमेढ

● **केशव उपाध्ये**, मुख्य प्रवक्ते – प्रदेश भाजपा

> नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अंतरिम अर्थसंकल्पात मोदी सरकारची दूरदृष्टी प्रतिबिंबित झाली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला जगात तिसऱ्या स्थानी आणण्याचे स्वप्न पाहतानाच या विकासाची फळे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याची काळजीही घेण्यात आली आहे.

**देशाचे** पंतप्रधानपद भूषविणाऱ्या व्यक्तीकडे भविष्यवेधी दृष्टिकोन असणे गरजेचे असते. पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे तो आहे. सरकारच्या आजवरच्या ध्येयधोरणांत तो प्रतिबिंबित होत आला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर– आगामी २५ वर्षांचा कालखंड हा विकासाच्या दृष्टीने 'अमृतकाल' असेल, असे पंतप्रधान म्हणाले होते. भारताला जगभरातील पहिल्या पाच देशांच्या पंक्तीत स्थान मिळवून देण्यासाठी काय करावे लागेल, याचा नियोजनबद्ध आराखडा त्यांनी या संकल्पनेतून देशापुढे ठेवला आहे. नुकत्याच सादर झालेल्या अंतरिम अर्थसंकल्पातही ही भविष्यवेधी दृष्टी प्रतिबिंब झाली. गेल्या १० वर्षांत सरकारच्या माध्यमातून घेण्यात आलेले निर्णय पाहता, 'विकसित भारत' या संकल्पनेविषयीचा त्यांचा दृढ आत्मविश्वास जाणवतो. अलीकडेच सुरू झालेल्या विकसित भारत संकल्प यात्रेत सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ किती जणांपर्यंत पोहोचला आहे आणि अद्याप हे लाभ आणखी किती जणांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे, हे स्पष्ट होत आहे.

सरकारने देशाला पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनविण्यासाठी कंबर कसली आहे. हे उद्दिष्ट साध्य केल्यानंतर भारताचा जगातील तीन बलाढ्य आर्थिक



महाशक्तींमध्ये समावेश होईल. ते ध्येय समोर ठेवूनच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम अर्थसंकल्पाची आखणी केल्याचा प्रत्यय त्यांनी विविध क्षेत्रांसाठी केलेल्या तरतुदींतून येते. या अर्थसंकल्पाने आर्थिक प्रगतीसोबतच सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य देऊन सरकारची धोरणे जनकेंद्री असल्याचे दाखवून दिले आहे. आणखी दोन–तीन महिन्यांनी लोकसभा निवडणूक होणार आहेत. निवडणुकीपूर्वी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात सामान्यपणे अनेक लोकप्रिय घोषणा करण्यात येतात. मात्र, या अंतरिम अर्थसंकल्पात अशा कोणत्याही घोषणा करण्यात आलेल्या नाहीत.

राजकोषीय तुटीचे लक्ष्य अपेक्षेपेक्षा चांगले आहे. ही तूट पुढील आर्थिक वर्षासाठी ५.१ टक्के ठेवण्याचे मोदी सरकारचे लक्ष्य आहे. यातून खासगी क्षेत्राचा भांडवली खर्च लक्षणीय प्रमाणात वाढेल. पायाभूत सुविधांसाठीची ११.१०लाख कोटींची तरतूद सरकारच्या धोरण सातत्याचा प्रत्यय देणारी आहे. भांडवली खर्चाची ही विक्रमी तरतूद रोजगाराच्या अनेक संधी निर्माण करणारी ठरणार आहे. ग्रामीण रोजगार योजनेसाठीची तरतूद ४३ टक्क्यांनी वाढवून ८६ हजार कोटी एवढी करण्यात आली आहे. कर आणि शुल्काबाबत कोणतेही मोठे बदल करण्यात आलेले नाहीत. यामुळे बाजारात जेवढे स्थैर्य राहील, तेवढा व्यवसायांना लाभ होईल. अंतरिम अर्थसंकल्पात भविष्याच्या दृष्टीने एक कोटी घरांच्या छतांवर सौर ऊर्जा प्रणाली बसवून गोरगरिबांची घरे उजळवणाऱ्या 'सूर्योदय योजने'ची तरतूद आहे. याद्वारे होणाऱ्या वीजनिर्मितीमुळे गोरगरिबांच्या वीजबिलावरील खर्चात वर्षाला १५ ते १८ हजार रुपयांची बचत होणार आहे. 'आयुष्मान भारत' योजनेचा लाभ आता सर्व आशा व अंगणवाडी सेविकांनाही मिळणार आहे. तीन रेल्वे कॉरिडोर, बंदर जोडणी कॉरिडोर, अधिक

रहदारीचा कॉरिडोर यांसारख्या निर्णयांमुळे भविष्यात मालहाताळणी, माल वाहतूक खर्च कमी होणार आहे. पायाभूत सुविधांसाठी राज्यांना ५० वर्षे मुदतीचे व्याजमुक्त कर्ज देण्यासाठी १.३० लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या सर्व तरतुदी पाहता, सरकारचा पायाभूत सुविधा विकासावर अधिक भर असल्याचे स्पष्ट होते. याशिवायही यात असंख्य चमकदार तरतुदी आहेत. आकर्षक आतषबाजी न करता उज्ज्वल भविष्याची गॅरंटी देणारा हा अर्थसंकल्प आहे, एवढेच तूर्तास म्हणता येईल.

पंतप्रधान मोदी हे आपल्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीबद्दल किती जागरूक आहेत, हे त्यांच्या 'लाभार्थी संवाद कार्यक्रमा'तून दिसते. वंचित वर्गाला सरकारी योजनांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सुदृढ होण्यासाठी मदतीचा हात द्यावा लागणार आहे आणि त्यासाठी या वर्गापर्यंत सरकारी योजनांचे लाभ १०० टक्के पोहचले आहेत की नाही हेही पाहिले पाहिजे, याची कल्पना असल्यामुळे पंतप्रधान मोदी सातत्याने लाभार्थ्यांशी संपर्क साधत असतात. सकल राष्ट्रीय उत्पादन वाढायचे असेल, तर विकास सर्वसमावेशक हवा. लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या असणाऱ्या वंचित वर्गाचे उत्पन्न वाढल्याखेरीज आपली अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सची होणार नाही, हे पक्के माहिती असणाऱ्या पंतप्रधान मोदी यांनी त्यासाठी लाभार्थी वर्गापर्यंत १०० टक्के लाभ पोहचविणारी यंत्रणा तयार केली आहे.

जून २०२२ मधील घटना आहे– गुजरातमधील भरूच येथे केंद्र सरकारच्या योजनांच्या लाभार्थ्यांशी संवादाचा कार्यक्रम सुरू होता. अयुब पटेल नावाची अपंग व्यक्ती, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या केंद्र सरकारच्या शिष्यवृत्ती योजनेतून आपल्या मुलींना कसा लाभ होत आहे, थोरली मुलगी डॉक्टर होऊ इच्छिते, असे पंतप्रधानांना सांगत होती. बारावीत गेलेली त्यांची मुलगी पंतप्रधानांशी बोलताना भावुक झाली.

मे २०१६ मध्ये पुण्यातली सहा वर्षांच्या वैशाली यादव नावाच्या मुलाच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी पंतप्रधानांना पत्र पाठविण्यात आले होते. त्या पत्राची पंतप्रधानांनी तातडीने दखल घेतली, शासकीय यंत्रणेला आदेश दिले. अवघ्या १५ दिवसांत त्या मुलीच्या हृदयावर शस्त्रक्रियाही झाली. त्यानंतर पुण्याच्या दौऱ्यावर आले असता पंतप्रधान मोदी वैशालीच्या कुटुंबीयांना आवर्जून भेटले. पंतप्रधान सर्वसामान्यांना आपलेसे का वाटतात, याचे उत्तर वरील घटनांतून मिळते. त्या मोडक्यातोडक्या हिंदीत लिहिलेल्या पत्राची दखल पंतप्रधान कार्यालयाने लगोलग घेतली आणि त्यासाठीची आवश्यक कार्यवाहीही तातडीने केली. लालफितीच्या कारभाराचे अनेक कटू घोट पचवलेल्यांना याचे अप्रूप वाटणारच. आता यावर– यापूर्वीही पंतप्रधान निधीतून अनेक रुग्णांवर शस्त्रक्रिया झाल्या आहेत, पूर्वीच्या पंतप्रधानांनी त्याचे श्रेय घेत जाहिरातबाजी केली नाही, पंतप्रधानांनी अशी कामे करायची असतात का, त्यांनी देशाचे आर्थिक, परराष्ट्र, संरक्षण धोरण ठरवायचे असते– अशा छापाचे युक्तिवाद हमखास केले जातील. पहिल्या प्रसंगात गुजरातमधील अयुब पटेल नावाची व्यक्ती आपल्या मुलींना केंद्राच्या अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजनेतून मदत मिळाल्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करते. त्या अयुब पटेल यांच्याशी संवाद साधताना ज्यांची 'अल्पसंख्याकविरोधी' अशी प्रतिमा निर्माण करण्यात आली आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ईद कशी साजरी केली? ईदनिमित्त मुलींसाठी काय खरेदी केली?' असे प्रश्न विचारले होते.

यातून मिळणारा संदेश, धार्मिक वाद–विवादांपासून स्वत:ला दूर ठेवणाऱ्या, हातावर पोट असणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तींच्या भावना व्यक्त करणारा असतो. भाजप सरकारच्या योजनांचे अल्पसंख्याक वर्गावर होणारे सकारात्मक परिणाम विचारात घेण्याची तसदी मोदींचे विरोधक, अभ्यासक, विश्लेषक घेताना दिसत नाहीत. मोदींवर मुस्लीमविरोधी असल्याचा शिक्का उमटवला, तर हातावर रोजी–रोटी अवलंबून असणारा मुस्लीम मोदींना मत देईलच कसा, असा (टीकाकारांच्या दृष्टीने) बिनतोड सवाल विश्लेषक वर्गाच्या अवकाशात फेकला जातो. पण लाभार्थी संवादांतून वंचित वर्गापर्यंत थेट पोहोचणाऱ्या मोदी सरकारने 'सब का साथ सब का विकास' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे, हे टीकाकारांच्या गावीही नसते. यालाच 'मोदीनॉमिक्स' म्हणतात. अर्थसंकल्पात गरीब कल्याणासाठी हजारो कोटींची तरतूद होते, ती संबंधितांपर्यंत पोहोचते की नाही यावर चौकीदाराचे लक्ष असल्याने अर्थसंकल्पातील आकडे केवळ कागदावरच राहात नाहीत, ते प्रत्यक्षात उतरतात. म्हणूनच या अर्थसंकल्पातून उज्ज्वल भविष्याची मुहूर्तमेढ रोवली जाणार आहे, असे खात्रीने म्हणता येते. ■

# तंत्रज्ञानाद्वारे गरीब कल्याण, भ्रष्टाचारमुक्त सुशासन

● डॉ. राधेश्याम चौधरी

> नव्याने विकसित तंत्रज्ञानाचा वापर करीत, अंत्योदयाच मूर्त रूप साकार करीत गरीब कल्याण साधत असतांनाच भारताला जागतिक महाशक्ती बनवण्याचा प्रवास मोदी सरकारच्या कार्यकाळात सुरू झाला आहे. जनधन-आधार-मोबाईल या तंत्रज्ञानाच्या त्रिमूर्तीच्या माध्यमातून मोदी सरकारने पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त सुशासन, नागरिकांच्या जीवनात वेळेची बचत साधत सुलभता आणून गरीब-वंचित घटकांचे आत्मभान जागवत नवा आत्मविश्वास, आत्मसन्मान दिला.

**गेल्या** ९ वर्षात २४ कोटी भारतीयांना गरिबीतून मोदी सरकारने मुक्त केले आहे. येणारी काही दशके ही भारताच्या जागतिक प्रभावाची असतील अस आंतरराष्ट्रीय समुदाय म्हणू लागलाय. म्हणून २०१४-२४ हे दशक भारताच्या मोदीजींच्या नेतृत्वातील भारताच्या पुनर्निर्माणाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल हे निर्विवाद सत्य आहे. प्रगत तंत्रज्ञान हे विकसित देशांची जहागिरी समजली जात होती. भारतासारख्या प्रचंड मोठ्या खंडप्राय देशाची फार मोठी शक्ती ही नागरिकांच्या मुलभूत गरजा भागवण्यातच खर्ची होत असे. एके काळी यातच सरकारची दमछाक होत असे. परंतु भारताचे दूरदर्शी पंतप्रधान मा नरेंद्र मोदीजी यांनी दशकभराच्या आपल्या नेतृत्वातील या सरकारच्या कार्यकाळात आपल्या विज्ञान-तंत्रज्ञानाविषयीच्या भुकेने



प्रत्येक भारतीयाचे जीवनमान बदलण्याचे, त्यावर सकारात्मक परिणाम करण्याचं शिवधनुष्य यशस्वीरित्या लीलया पेलले. तंत्रज्ञान हे फक्त उच्चवर्गांसाठीच असते, हा समज मा मोदीजींनी खोटा ठरवला. याउलट नव्या तंत्रज्ञानाचा वापर करीत दीनदयालजींच्या अंत्योदयाच्या शिकवणीतून गरीब कल्याणाचा अजेंडा यशस्वीपणे साधला.

मा मोदीजी म्हणतात, तंत्रज्ञान म्हणजे वेग(Speed), साधेपणा (Simplicity), सेवा(Service) यांच मिश्रण. तंत्रज्ञान वेगवान आहे, वापरायला सोपे, लोकांची सेवा करण्याचे उत्तम, सुलभ साधन आहे. मोदीजींच्या मते गरीब ही या देशातील सर्वात मोठी जाती आहे. म्हणूनच की काय त्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करीत सुशासनातून वेगाने गरीब कल्याणाचा अजेंडा राबवायला प्राथमिकता दिल्याचे दिसते. मोदी सरकारने सत्तेत आल्यापासून मोबाईलच्या स्वदेशी निर्मितीला प्रोत्साहनपर धोरण आखल्यामुळे मोबाईलच्या किंमती सामान्यांच्या खिशाला परवडेल अशा झाल्या. मोबाईल सहज, स्वस्तपणे उपलब्ध होवू लागले. प्रतिजीबी मोबाईल डाटा ३०८ रू.वरून फक्त १० रूच्या आत आला. या सर्वांचा परिणाम म्हणून या दशकात या देशात मोबाईल वापरकर्त्यांची संख्या १२० कोटीपेक्षा जास्त झाली. शून्य बॅलन्सची जवळपास ५० कोटीपेक्षा जास्त जनधन सामान्य कुटुंबियांची उघडण्यात आली. आतापर्यंत १३३ कोटीपेक्षा जास्त देशवासियांना आधार कार्ड, क्रमांक वितरीत करण्यात आलेले आहेत. जनधन-आधार-मोबाईल(JM²)या तंत्रज्ञानावर आधारीत त्रिमूर्तीचा वापर करीत सरकारच्या योजना, आर्थिक लाभ

देशाच्या काना कोपऱ्यातील गरजूंपर्यंत वेगाने पोहोचू लागल्या. भ्रष्टाचाराला वेसण बसू लागली. वेळेची बचत होऊ लागली, पारदर्शिता वाढू लागली.

जवळपास १२ कोटी शौचालयांचे वैयक्तिक अनुदान, ४ कोटी आवास योजनांचा लाभ, १२ कोटी शेतकऱ्यांचा सन्मान निधी, ३५ लाख फेरीवाल्यांना स्वनिधी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी अशा कैक प्रकारची सरकारी मदतीची थेट रक्कम विक्रमी रू.२५ लाख कोटींची आर्थिक मदत आधार संलग्न थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी)च्या योजनेद्वारा तंत्रज्ञानाचा वापर करून कोट्यावधी देशवासीयांचे जीवन कल्याण मोदी सरकार यशस्वीपणे साधते आहे.

देशातील ८० कोटी जनतेला मोफत अन्नधान्याचा पुरवठा देशात मोदी सरकारद्वारा केला जात आहे. वन नेशन-वन रेशन कार्ड या योजनेद्वारे देशभरात कुठेही रेशन पात्र लाभार्थी घेवू शकतात. रोजगार, शिक्षण, व्यवसाय आदि कारणांनी स्थलांतरे करणाऱ्या कुटुंबियांना मोफत रेशनचा लाभ मिळण्यासाठी फार मोठा दिलासा यातून मिळतो आहे.

तंत्रज्ञानाचा वापर करीत ४.२ कोटी बनावट शिधापत्रिका तर ४.११ कोटी नकली-बनावट एलपीजी जोडण्या रद्द केल्या गेल्या. थेट लाभामुळे सरकारी अनुदानाची गळती, अपव्यय याला मोठ्या प्रमाणावर चाप बसला. तंत्रज्ञानाचा वापर करीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील बनावट, नकली, अपात्र लाभार्थी हटवल्यामुळे सरकारची एकूण २.७३ लाख कोटी रु.ची बचत आतापर्यंत झाली आहे.

यूपीआय (मोबाईल बँकिंग)च्या निर्मितीमुळे सामान्य माणूस बँकेत न जाता मोबाईलचा वापर करत 'यूपीआय'द्वारे किराणा, भाजीपाला खरेदी-विक्री करू शकतो, सामानाची खरेदी, प्रवासाची तिकीट खरेदी आदि व्यवहार ग्रामीण, दुर्गम भागातही घरबसल्या पैशांची देवाणघेवाण मोबाईलद्वारे यूपीआयचा वापर करून बिनदिक्कतपणे बाराही महिने २४ तास करू शकतो.

जागतिक डिजीटल पेमेंटमधे जगात भारताचा वाटा ४०% एवढा लक्षणीय आहे. २०२२-२३ या वर्षात १३९.१५ लाख कोटी रू. एवढ्या मूल्याचे व्यवहार भारतात झाले. मजूर असो, महीला असो, शेतकरी असो कि भाजी विक्रेता हे सर्व सामान्य घटक बँकिंग यंत्रणेशी जोडून त्यांचे जीवनमान सुरक्षित व सुखकर करण्याचे काम




मोदी सरकारने या दशकात केले.

१.९३ लाख ग्रामपंचायती ऑप्टीक फायबरद्वारे भारत नेटच्या माध्यमातून जोडल्या गेल्या. सरकारी व्यवस्थेच्या व्यापक तंत्रस्नेही डिजीटलायजेशनमुळे सरकारी योजना तळागाळापर्यंत वेगाने पोहोचण्यास मोठी मदत होत आहे. GEM² पोर्टलद्वारे अनेक सामान्य, लहान, मध्यम पुरवठादार सरकारी व्यवस्थेशी जोडले जावून उन्नती साधताहेत.

सरकारच्या अनेक सेवांचा, योजनांचा अर्ज मोबाईल, इंटरनेट वापर करून घरबसल्या करता येवून लाभ घेता येतो. सरकारी कार्यालयाशी विविध कल्याणकारी योजना संदर्भात संपर्क, पाठपुरावा, तक्रार आदि सर्व काही डिजीटलाजेशनमुळे घरबसल्या सहज शक्य होत आहे. मोबाईलवर आधारीत तज्ञ वैद्यकिय सल्ला टेली मेडीसीन तंत्रज्ञानाद्वारे टेली कन्सल्टेशनद्वारे देशाच्या दुर्गम, दूरवरच्या भागातील १५ कोटी रूग्णांना दिलासा देण्याच काम सरकारने केल आहे. मोबाईलचा वापर करत आभा कार्ड नोंदणी करता येते. कोविड लसीकरणाची अपॉइंटमेंट ते प्रमाणपत्र अशी पूर्ण मोहीम ही संपूर्ण देशवासियांसाठी मोफत डिजिटल प्लॅटफॉर्मवर राबवण्यात आली.

अशा विविध जनकल्याणकारी धोरणांमुळे, योजनांमुळे गरीब-वंचीत घटकांचा सरकारबद्दलचा आदर व विश्वास कैक पटीने या दशकात मोदी सरकारच्या कार्यकाळात वाढलाय. सर्वसामान्यांच्या मनात सुरक्षितता, आत्मसन्मान, आत्मविश्वास जागला आहे ही मोदी सरकारची सर्वात मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.

**(श्री. चौधरी हे जळगाव लोकसभा निवडणूक प्रमुख आहेत.)**

# महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी 15 हजार 544 कोटींची तरतूद

● स्वानंद कोंडोलीकर,

भारतीय रेल्वेने पिंक बुक बजेट नुकतेचं प्रकाशित केले, भारतीय रेल्वेचे पिंक बुक अभ्यासले असता महाराष्ट्रातील रेल्वेसाठी भरीव तरतूद केले असल्याचे दिसून येते. भारतीय रेल्वेच्या अंतरीम बजेटमध्ये महाराष्ट्रातील रेल्वेला १५ हजार ५४४ कोटी रुपयाचा भरीव निधी मंजूर करण्यात आला. महाराष्ट्राचा बहुतांश भाग मध्य रेल्वे अंतर्गत तर मराठवाड्याचा भाग दक्षिण मध्य रेल्वेअंतर्गत येतो. या अंतरीम बजेटचे वैशिष्ट्य म्हणजे दक्षिण मध्य रेल्वेकडून ही भरीव निधी मिळाला आहे.

**मराठवाड्यासाठी** अत्यंत आवश्यक असलेल्या छत्रपती संभाजी नगर-अंकाई (मनमाड) या ९८ किमी रेल्वे मार्गाला २१४ कोटी रु. मंजूर करण्यात आले आहेत. तर अकोला-पूर्णा-नांदेड-सिकंदराबाद-दौण २१९ कोटी ९९ लाख ९८ हजार रु. तरतूद करण्यात आली आहे. मराठवाड्यासाठी आवश्यक असलेल्या लातूररोड रेल्वे मार्गासाठी ४० कोटी रु. परळी वैजनाथ रेल्वेमार्गासाठी ४० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. अंकाई रेल्वेमार्गासाठी २० कोटी तर मुदखेड बायपास मार्गासाठी ६ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. ह्याच बरोबर बहुचर्चित परळी-वैजनाथ-बीड-नगरसाठी २७५ कोटीची तरतूद केली आहे.



नांदेड वर्धा यवतमाळ नवीन रेल्वे मार्गासाठी ७५० कोटी रुपयांची तरतूद या बजेट मध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या तुळजापूर रेल्वे नकाशावर येण्यासाठी ही केंद्र सरकारने कंबर कसल्याचे दिसून आले. सोलापूर -तुळजापूर -धाराशिव या ८४ किमी नवीन रेल्वे मार्गासाठी २२५ कोटी रु. तरतूद केल्याने हे काम ही मार्गी लागण्याचे बोलले जाते.

ह्या व्यतिरिक्त विदर्भासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या अकोला खंडवा महू गेज साठी ६१० कोटी रु. तरतूद करण्यात आली आहे. यावरून मध्य रेल्वे तसेच दक्षिण मध्य रेल्वे या भागाला भरभरून निधी मिळाल्याचे दिसून येते. ह्यासोबतच संपूर्ण महाराष्ट्रातील दौंड-मनमाड दुहेरीकरणासाठी ३०० कोटी रु. तर पुणे -मिरज -कोंढवा दुहेरीकरणाकरिता २०० कोटी रु., मनमाड -जळगांव तिसरी लाईन १२० कोटी रु., इगतपुरी मनमाड तिसरी लाईन ५ कोटी रु., वर्धा नागपूर तिसरी लाईन १२५ कोटी ८९लाख ९९ हजार रु., वर्धा नागपूर चौथी लाईन १२० कोटी रु., नागपूर इटारसी लाईन ३२० कोटी रु. निधी मंजूर करण्यात आला. महाराष्ट्र ते गुजरातचे अंतर ८५ किमीने कमी करण्यासाठी ३५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

भुसावळ वर्धा तिसऱ्या लाईनसाठी १०० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. एकूण बघता महाराष्ट्रासाठी भरभरून निधी मिळाला आहे.

## रेल्वे मार्गाचे नांव

**नगर-बीड-परळी वैजनाथ**

**कामाचा प्रकार-** (नवीन रेल्वेमार्ग)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-** (२७५ कोटी)

**वर्धा -यवतमाळ -नांदेड**

**कामाचा प्रकार-** (नवीन रेल्वेमार्ग)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद -** (७५० कोटी)

**सोलापूर -तुळजापूर -धाराशिव**

**कामाचा प्रकार-** (नवीन रेल्वेमार्ग)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-** (२२५ कोटी)

**धुळे-नरडाणा**

**अंतर किमी-** (३४किमी)

**कामाचा प्रकार-** (नवीन रेल्वे मार्ग)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-**(३५० कोटी)

**बिदर-नांदेड**

**अंतर किमी-** (१५५ किमी)

**कामाचा प्रकार-** (नवीन रेल्वेमार्ग)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-**
(१ हजार कोटी)

**कल्याण-मुरबाड**

**कामाचा प्रकार-** (नवीन रेल्वे मार्ग)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-** (१० कोटी)

**दौंड-मनमाड**

**कामाचा प्रकार-** (दुहेरीकरण)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-** (३०० कोटी)

**पुणे -मिरज- लोंढा**

**कामाचा प्रकार-** (दुहेरीकरण)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-**(२०० कोटी)

**मनमाड -जळगांव**

**कामाचा प्रकार-** (तिसरी लाईन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-** (१२० कोटी)

**इगतपुरी -मनमाड**

**कामाचा प्रकार-** (तिसरी लाईन)

**बजेट २०२४-२५ मध्ये निधीची तरतूद -** (५ कोटी)

**कल्याण -कसारा**

**कामाचा प्रकार-** (तिसरी लाईन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-**(८५ कोटी)



**अंकाई -मनमाड -संभाजीनगर**

**कामाचा प्रकार-** (दुहेरीकरण)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद -** (२१४ कोटी)

**अकोला -पूर्णा -मुरखेड -ढोण**

**कामाचा प्रकार-** (दुहेरीकरण)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-**
(२१९ कोटी ९९लाख ९८हजार रुपये)

**वर्धा -नागपूर**

**कामाचा प्रकार-** (तिसरी लाईन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद -**
(१२४ कोटी ८९ लाख ९८ हजार रुपये)

**वर्धा -नागपूर**

**कामाचा प्रकार-** (चौथी लाईन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद -** (१२० कोटी)

**नागपूर -इटारसी**

**कामाचा प्रकार-** (तिसरी लाईन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद -** (३२० कोटी)

**वर्धा -बल्हारशा**

**कामाचा प्रकार-** (तिसरी लाईन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद -** (२०० कोटी)

**नागपूर -नागभीड**

**कामाचा प्रकार-** (गेज परिवर्तन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद -** (००० कोटी)

**अकोला -खंडवा -महू गेज परिवर्तन**

**कामाचा प्रकार-** (गेज परिवर्तन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद -** (६१० कोटी)

**भुसावळ -अकोला -वर्धा**

**कामाचा प्रकार-** (तिसरी लाईन)

**बजेट २०२४-२५ साठी निधीची तरतूद-** (१०० कोटी)

**(श्री. कोंडोलीकर हे मध्य रेल्वेचे विभागीय सल्लागार समिती सदस्य आहेत.)**

# ‘महाविजया’ची तुतारी

लोकसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीत जनमताचा कौल कसा असेल, याचा अंदाज प्रकट करणाऱ्या जनमता चाचण्यांचे निष्कर्ष हाती येऊ लागले आहेत. संसदेच्या अर्थसंकल्पी अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षात विकसित भारत संकल्पाचा लेखा-जोखा मांडला.



**हा** लेखा–जोखा मांडताना पंतप्रधान मोदी यांनी लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला ३७० पेक्षा अधिक तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ४०० पेक्षा अधिक जागा मिळतील, असा विश्वास व्यक्त केला. त्याच पार्श्वभूमीवर जनमत चाचण्यांचे निष्कर्ष प्रसिद्ध झाले. भारतीय राजकारणाचा बदललेला पोत यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीच्या निकालातून स्पष्ट होणार आहे. आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १९५२ पासून झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालांकडे दृष्टिक्षेप टाकल्यावर गेल्या ३०–३५ वर्षात देशाचे राजकारण टप्प्या–टप्प्याने कसे बदलत गेले, निवडणुकीतील प्रचाराचे मुद्दे कसे बदलले, राष्ट्रीय राजकारणाची नेपथ्यरचना धर्म–जात यासारख्या विचारांना ओलांडून विकास केंद्रीत कशी झाली याची पटकथा आपल्या समोर उभी राहते. या पटकथेतील पात्रे कालानुरूप कशी बदलली, हे समजून घेण्यासाठी भारतीय मतदाराच्या बदलत्या मानसिकतेचा मागोवा घेणे आवश्यक ठरते. दीर्घकाळ लोकसभा निवडणुकीच्या खेळाची नेपथ्यरचना काँग्रेसच्या नेतृत्वाखाली समाजवादी आणि साम्यवादी विचारधारांच्या हाती होती. राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण आणि एकूणच समाजमन राष्ट्रवादाऐवजी पाश्चात्य विचार केंद्रीत ‘स्वत्वा’चा त्याग केलेल्या कणाहीन मानसिकतेमध्येच राहण्याची बिजे काँग्रेससह समाजवादी आणि साम्यवादी विचारधारांनी रूजवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परिणामी प्रचंड अंगभूत सामर्थ्य असलेला भारत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दीर्घकाळ अन्य देशांच्या तुलनेत अपेक्षित प्रगती साधू शकला नाही. काँग्रेस, समाजवादी आणि साम्यवाद्यांनी भारतातील दारिद्र्य वैश्विक व्यासपीठावर अभिमानाने मिरवण्यात धन्यता मानली. भारतीय जनतेला अन्य प्रगत, सामर्थ्यशाली देशांच्या स्पर्धेत उतरवण्यासाठी विजीगिषू बनवण्याकडे हेतूपूर्वक दुर्लक्ष केल्याने विकासाच्या क्रमवारीत आपण जवळपास तळात जाऊन बसलो.

सर्वसमावेशक विकासाची संकल्पना अत्याधुनिक तंत्रप्रणालीच्या आधारे राबवून सरकारनामक व्यवस्थेला खऱ्या अर्थाने लोकाभिमुख बनवून मोदी सरकारने काय चमत्कार केला, याचा अनुभव समान्य माणूस घेत आहे. निम्म्या जगावर दीर्घकाळ राज्य केलेल्या इंग्लंडला मागे टाकून भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर जाणे हा नव्या भारताचा अविष्कार आहे. भारतीय मतदारालाही आपल्या देशाच्या बदललेल्या रुपड्याचा अनुभव येऊ लागला आहे. त्याचेच प्रतिबिंब लोकसभा निवडणुकीच्या निकालात उतरणार आहेत, यात शंका नाही. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना पंतप्रधान मोदी यांनी देशाची सत्ता दीर्घकाळ भोगलेल्या काँग्रेसच्या राजवटीचा आकडेवारीनिशी पंचनामा केला. त्यावेळी



अनेकांच्या नाकाला मिरच्या झोंबल्या.

पंतप्रधान मोदींनी संसदेत भारतीय जनता पार्टी ३७० चा आकडा पार करेल, असा आत्मविश्वास बोलून दाखवला. इंडिया टुडे-आज तक, टाईम्स नाऊ या वृत्तवाहिन्यांच्या जनमत चाचण्यांचे निष्कर्ष पंतप्रधानांच्या आत्मविश्वासाला दुजोरा देणारे ठरले आहेत. इंडिया टुडेच्या अंदाजानुसार राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ३३५ तर भारतीय जनता पार्टीला ३०४ जागा मिळण्याचा अंदाज आहे. वृत्तवाहिन्यांच्या जनतम चाचण्यांच्या अंदाजापेक्षा भारतीय जनता पार्टीला २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत अधिक जागा मिळाल्या होत्या. त्याचीच पुनरावृत्ती यावेळी होण्याची चिन्हे आहेत. २०१९ मध्ये भारतीय जनता पार्टी ३०० चा आकडा पार करेल, याचा अंदाज भल्या-भल्या राजकीय पंडितांना आला नव्हता. टाईम्स नाऊ या वृत्तवाहिनीने केलेल्या पाहणीतही भारतीय जनता पार्टी ३०० चा आकडा पार करेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. टाईम्स नाऊच्या सर्वेक्षणात ६४ टक्के मतदारांनी पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांच्या नावाला पसंती दिली आहे. मॅट्रीझ एनसी या संस्थेने केलेल्या सर्वे क्षणात भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ३६६ जागा मिळतील, असे अनुमान वर्तवण्यात आले आहे. प्रत्यक्षात निकाल हाती येतील तेव्हा भारतीय जनता पार्टीचे संख्याबळ ३७० च्या पेक्षाही अधिक असेल, असा विश्वास आहे.

१९८४ पासून २०१४ पर्यंत कोणत्याच पक्षाला लोकसभा निवडणुकीत स्वबळावर बहुमत मिळवता आले नव्हते. २०१४ च्या निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर मतदारांनी अभूतपूर्व विश्वास ठेवत भारतीय जनता पार्टीला २८२ जागांवर यश मिळवून दिले. २०१९ च्या निवडणुकीत मतदारांचा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास आणखी दृढ झाल्याचे दिसले. भारतीय मतदारांचे प्राधान्यक्रम निर्णायक स्वरूपात बदलल्याचे २०१४ च्या निवडणुकीपासून वारंवार प्रत्ययास येत आहे. देशाची सत्ता नरेंद्र मोदी यांच्यासारख्या खमक्या नेत्याकडेच हवी, हा मतदारांचा विश्वास गेल्या १० वर्षातील मोदी सरकारच्या कारभारावर आधारीत आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून गोरगरिबांच्या कल्याणाच्या नावाने पं.नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या सरकारच्या काळातही अनेक योजनांवर कोट्यवधीचा निधी खर्च झाला. त्या योजनांच्या प्रत्यक्ष लाभार्थ्यांची संख्या मात्र अत्यल्पच होती. प्रशासनातील आणि व्यवस्थेतील मध्यस्थ, दलालांनी गरीब कल्याणाचा निधी ओरबाडून खाल्ला.

गेल्या १० वर्षात सरकारी कार्यालयात खेटे न घालता लाभार्थ्यांच्या बँक खात्यात सरकारी अर्थसहाय्य बिनबोभाट जमा होऊ लागले. भारतात असं काही होऊ शकतं यावर अनेकांचा विश्वास बसत नव्हता. वंचितांसाठीचे हे सरकारी अर्थसहाय्य या वर्गाला देशाच्या विकासात सामील करून घेण्यासाठी दिलेला मदतीचा हात आहे. मुद्रासारख्या योजनांच्या माध्यमातून अनेक सामान्य तरुण उद्योजक बनले आहेत. नव भारताच्या जडणघडणीत तळागाळातला वंचित घटकही स्वाभिमानाने सहभागी होत आहे. गेल्या १० वर्षातील विकासाची ही यशोगाथा मतदारांच्या भाजपावरील महाविश्वासातून महाविजयाच्या रूपाने प्रकट होईल, यात शंका नाही. ■

# 'नेहरूवादा' ऐवजी आता कल्याणवाद!

● देवांश शहा

> लोकशाहीमध्ये राष्ट्राच्या विकासात्मक उद्दिष्टांशी जुळवून घेणारी धोरणे आखणाऱ्या राजकीय विचारधारांनाच अखेर लोकांकडून पाठिंबा मिळतो. त्यामुळे 'नेहरूवादी' समाजवादापासून ते स्पर्धात्मक कल्याणवादात झालेले परिवर्तन हे भारताच्या वैविध्यपूर्ण लोकसंख्येच्या विकसित आकांक्षा आणि गरजांशी अनुकूलता दर्शवणारेच आहे आणि ते प्रत्येक निवडणुकीत सिद्ध होते आहे!

**भारतीय** राजकारणात अलीकडे झालेला मोठा वैचारिक बदल म्हणजे कल्याणकारी योजनांवर भर देण्यात आला असूनही,आर्थिक वाढीकडे- उद्योगांच्या भरभराटीकडे पुरेसे लक्ष दिले जाते आहे. याला 'स्पर्धात्मक कल्याणवाद' असे म्हणता येईल आणि त्याचा निवडणूक निकालांवरही लक्षणीय परिणाम झाला आहे. भारत जसजसा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीकडे वाटचाल करत आहे, तसतसे नेहरूवादी समाजवादाचे अपयश आणि 'स्पर्धात्मक कल्याणवादा'चे यश अधिकच स्पष्ट होते आहे. आर्थिक विचारसरणीत होत असलेला हा बदल भारताच्या राजकीय पटलावरील सखोल परिवर्तनाचा द्योतक ठरला आहे. हा बदल केवळ देशाच्या आर्थिक धोरणांमधील महत्त्वपूर्ण उत्क्रांती दर्शवत नाही तर त्याच्या मतदारांच्या उत्क्रांत होणाऱ्या प्राधान्यक्रम आणि आकांक्षांचे प्रमुख सूचक म्हणूनही काम करतो. हा वैचारिक बदल जागतिक आर्थिक आणि राजकीय गतिमानतेमध्ये खोलवर गुंफलेले आहेत, त्यामुळेच आगामी निवडणुकीतील लढत कशी असेल याचा अंदाज येण्यासाठी आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाहींपैकी एक असलेल्या भारतातील मतदारांच्या पसंतींचे बदलते रूप समजून घेण्यासाठी या बदलांकडे पाहिले पाहिजे.

**'नेहरूवादी' समाजवाद**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली समाजवाद-प्रणीत आर्थिक प्रारूप स्वीकारले. म्हणजेच सरकारच्या नेतृत्वाखालील औद्योगिकीकरण, केंद्रीय नियोजन आणि मिश्र अर्थव्यवस्थेवर भर दिला. नवीन राष्ट्रात उच्चभ्रूंची नवी फळी निर्माण करण्यासाठी जलद औद्योगिकीकरण आणि लायसन्स राजद्वारे नियंत्रित असे मजबूत सार्वजनिक क्षेत्र आवश्यक आहे, असा नेहरूंचा विश्वास हे प्रारूप स्वीकारण्यामागे असावा. हेतू चांगले असूनही, नेहरूंच्या योजनेचा भारताच्या आर्थिक विकासावर आणि सामाजिक कल्याणावर विपरीत परिणाम झाला. सरकारचा हस्तक्षेप, लायसन्स राज आणि अवजड उद्योगांवर भर या साऱ्याच्या परिणामी आर्थिक वृद्धीचा दर (सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या म्हणजेच 'जीडीपी'च्या वाढीचा दर) या सर्व काळात दरवर्षी सरासरी २.१ टक्के इतकाच राहिला. भारतात दारिद्र्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली, मोठ्या प्रमाणावर निरक्षरता आणि कुपोषण वाढले. या प्रारूपाने कृषी आणि लघु उद्योगांकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे आर्थिक विकासाचा समतोल ढासळला. प्रमुख क्षेत्रांवर राज्य यंत्रणेच्या नियंत्रणामुळे नवकल्पना थांबली. नेहरूवादावरच पुढेही भर राहिल्यामुळे जागतिक व्यापार आणि उत्पादनातील संधी भारताने गमावल्या. त्यामुळे भारताला एक महत्त्वपूर्ण जागतिक आर्थिक शक्ती बनणे या काळात अशक्यच ठरले, उलट देशामध्ये आर्थिक विषमता, भ्रष्टाचार बोकाळले. धोरणातील या अपयशामुळे भारताच्या प्रगतीला आणखी अडथळा निर्माण झाला. थोडक्यात, नेहरूवादी समाजवाद हा भारताच्या यश आणि समृद्धीमध्ये

एक मोठा अडथळा ठरला होता. त्यामुळेच विविध क्षेत्रांमध्ये आपल्या देशाची क्षमता मर्यादित होती आणि त्यामुळे सामाजिक आव्हानेदेखील वाढत होती.

**उदारीकरणाचे श्रेय**

नेहरूवादी समाजवादाने भारताची आर्थिक वाढ कुंठित केली, देश जवळपास डबघाईला येण्याकडे वाटचाल करू लागला. त्यामुळेच भारतीय रिझर्व्ह बँकेला अर्थव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ जपानकडे ४६.९१टन सोने गहाण ठेवावे लागले,या घडामोडी १९८०च्या दशकाच्या अखेरीस घडत होत्या. त्यातून बाहेर पडण्यासाठी १९९१ पासून आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारावेच लागणार होते कारण अर्थसंकल्पात वाढती तूट, परकी चलनाची गंगाजळी आटलेली आणि जग तर पुढे चाललेले अशी स्थिती त्या वेळी होती. पंतप्रधान म्हणून पी.व्ही. नरसिंह राव यांनी हे बदल स्वीकारले, याचे श्रेय त्यांना दिले पाहिजे. भारताच्या बंदिस्त अर्थकारणाला त्यांनी खुले केले, बाजार–अभिमुख केले.

**त्याहीपुढले पाऊल!**

एकविसाव्या शतकात २०१४ नंतर पुन्हा मोठा धोरणात्मक बदल भारताने पाहिला आहे. हा बदल म्हणजे 'स्पर्धात्मक कल्याणवाद'– भारतीय जनता पक्षाच्या अनेकानेक वर्षांच्या वाटचालीतून आणि भारतीय संदर्भ न सोडता विचार करण्याच्या सवयीतून आलेला आहे. हे आर्थिक वाढीचे निराळे प्रारूपच म्हणावे लागेल आणि बाजारस्नेही धोरणे तसेच नेमकेपणाने आखलेल्या कल्याणकारी योजना यांचा मेळ घालणे हे या प्रारूपाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे, हेही मान्य करावे लागेल. या प्रारूपातील कल्याणकारी योजनांच्या आखणीमुळेच वंचित, दुर्लक्षित, उपेक्षित समाजघटकांनाही आता आर्थिक वाढीत वाटा देण्याची संधी मिळू लागलेली आहे.

मेक इन इंडियासारख्या उल्लेखनीय उपक्रमांचे उद्दिष्ट सन २०२५ पर्यंत उत्पादन क्षेत्राचा 'जीडीपी'मधील वाटा २५ टक्क्यांपर्यंत वाढवून १०० दशलक्ष रोजगार निर्माण करण्याचे आहे. सन २०१७ च्या जुलैपासून लागू झालेला 'वस्तू आणि सेवा कर' (जीएसटी) ही एक महत्त्वाची आर्थिक सुधारणा ठरली आहे. भारताच्या बाजारपेठेला एकत्रित करण्याचे काम या कराने केले. जीएसटी क्रमांक घेणाऱ्यांची नोंदणी संख्या आता वाढून अंदाजे १.४ कोटींपर्यंत पोहोचलेली आहे. जीएसटी संकलनाच्या रकमेतील वार्षिक वाढसुद्धा सुमारे ११ टक्के इतकी होते आहे. 'प्रधानमंत्री जन धन योजने'सारख्या कल्याणकारी योजनांचा लक्षणीय परिणाम समाजातील वंचित, उपेक्षित घटकांच्या आर्थिक समावेशनावर झालेला दिसतो आहे. त्यामुळेच एकंदर दोन लाख कोटीं रुपयांपेक्षा जास्त ठेवी असलेली, ५० कोटींहून अधिक खाती जमा झाली आहेत. बँकखात्यांतील या वाढीच्या परिणामी डिजिटल व्यवहारदेखील वाढले आहेत. आर्थिक वर्ष १७–१८ मध्ये झालेल्या डिजिटल व्यवहारांची संख्या १,४७१ कोटी इतकीच होती, ती संख्या वाढून आता आर्थिक वर्ष २२–२३ मध्ये ११,३९४ कोटीपर्यंत गेलेली आहे. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा लाभ घरोघरीच्या गरीब महिलांपर्यंत पोहोचलेला आहेच, पण प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत ४० कोटी घरे बांधून झाली आहेत. या साऱ्याचा भारतातील उपेक्षित समुदायांच्या जीवनावर सखोल परिणाम होत आहे.

हा बदल केवळ प्रशासकीय नाही, केवळ आर्थिक धोरणातला हा बदल नसून तो वैचारिक बदल आहे. त्यामुळेच त्याचे प्रतिबिंब निवडणुकीतही दिसून येते. मे २०१४ नंतर २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्येही भाजपला विजयात योगदान होते ते कल्याणकारी उपक्रमांवर भाजपच्या धोरणात्मक कृतनिश्चयाचे. अगदी अलीकडच्या राज्य निवडणुकांमध्येही भाजपचा झालेला विजय आणि तेलंगणासारख्या प्रदेशात भाजपचे वाढते मताधिक्य हेदेखील याच वैचारिक बदलाचा स्वीकार करण्याच्या मतदारांच्या प्रवृत्तीला अधोरेखित करणारे आहे. दुसरीकडे विरोधी पक्षांना, विशेषत: काँग्रेसला, २०१४ पासून, भाजपच्या कल्याणकारी आणि विकासात्मक धोरणांच्या प्रचाराशी मुकाबला करणे तर अशक्यच, पण त्याचा प्रतिवाद करण्यासाठीही केवढा आटापिटा करावा लागतो, हेही वारंवार दिसतेच आहे. विकसित होणाऱ्या या राजकारणाच्या केंद्रस्थानी कल्याणकारी योजना आहेत, त्यामुळे संपूर्ण भारतभर निवडणूक धोरणे आणि मतदारांची प्राधान्ये पुन्हा परिभाषित केली जाऊ लागली आहेत.


**(श्री. शहा हे केंद्रीय दळणवळण राज्यमंत्री देवूसिंह चौहान यांचे धोरणसल्लागार; 'भाजयुमो'च्या राष्ट्रीय धोरण, संशोधन व प्रशिक्षण पथकाचे सदस्य आहेत.)**

**(सौजन्य: दै. लोकसत्ता)**

# राममंदिर ते राष्ट्रमंदिर

● **शिवराय कुलकर्णी**, प्रदेश प्रवक्ते

> अयोध्येतील श्रीराम प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने देशभरात जी एकात्म भावना निर्माण झाली आहे, तिच्या बळावर राष्ट्रमंदिराचीही उभारणी होऊ शकते. या वाटेवर भ्रष्टाचारमुक्त, समरस, संपन्न समाजासाठी मानसिक परिवर्तनाची तयारी तर अभिप्रेत आहेच, शिवाय श्रीरामांचे आदर्श समोर ठेवून व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तन-व्यवहारात सकारात्मक, सुनिश्चित, सातत्यपूर्ण बदलही अपेक्षित आहेत. तसे झाले तर आपल्याला स्वत:च्या अन् देशाच्याही प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर 'राम' गवसल्याशिवाय राहणार नाही!



**श्रीरामजन्मभूमीचा** लढा दीर्घकाळ चालला. तो अखेर आता ४९६ वर्षांनी संपला आहे. रामायण म्हणजेच रामकथा ही भारतीय भावभावनांची भागीरथी आहे. श्रीरामचंद्र हे पिढ्यान्‌पिढ्या भरतभूचे आदर्श आहेत. राष्ट्रीय अस्मितेवर लागलेला परकीय आक्रमकाचा कलंक पुसला जाणे ही कुठल्याही स्वतंत्र राष्ट्रासाठी गौरवाची आणि ऐतिहासिक स्वरूपाची बाब असते. श्रीरामजन्मभूमीवर भव्य मंदिर आकाराला आले आहे. श्रीरामचरित्राकडे पाहता या मंदिराच्या उभारणीसोबत राष्ट्रमंदिराची मजबूत उभारणीही अत्यंत महत्त्वाची असल्याचे जाणवते. मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांचा प्रवास हा एका सभ्यतेचा प्रवास होता. राम चालले तो तर सत्पथ! राम ज्या दिशेने चालतील तोच सन्मार्ग असे हे आदर्श जीवन होते. त्याच आदर्शांवर चालणारे समाजमन तयार करण्याची जबाबदारी आता वर्तमानात घ्यावी लागणार आहे. त्यातूनच भारताचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल, यात तीळमात्र शंका नाही. वर्तमानातील अनेक घटना सामान्य माणसाला सुन्न करतात. समाज बधीर झाला असावा, असे अनेकदा वाटू लागते. अशा स्थितीत आपल्याला पुन्हा 'राम'च हवा असतो! प्रभू श्रीरामाच्या काळातही अत्यंत जागरूकतेने वावरणारा समूह केवळ चिंतित नव्हता, तर तो परिवर्तनाच्या दिशेने प्रयत्नशील होता. या समूहाला चिंता होती भरतभूच्या भवितव्याची. या समूहासाठी श्रीराम हेच आशेचा किरण होते आणि तेच त्यांचा विश्वास होते. असूरी शक्तींवर मानवतेचा, अधर्मावर धर्माचा विजय बघण्यासाठी साऱ्या भरतवर्षात एका योजनेला आकार दिला जात होता. याची कल्पना न रामाला होती न चक्रवर्ती सम्राट दशरथाला. अयोध्या आपल्याच सुखात मग्न होती. वंचितांचे अश्रू कुणी पुसायचे? अधमांकडून भरडल्या जाणाऱ्या सज्जन शक्तीचा वाली कोण? सर्व समाजघटक समाधानी आहेत का?



अवतीभोवती अमानवी शक्तींनी उच्छाद मांडला असताना राजांना स्वतःच्या क्षात्र तेजाचे विस्मरण कसे काय होऊ शकते, अशा असंख्य प्रश्नांवर एका व्रतस्थ समूहाचे चिंतन सुरू होते. कारण समग्र मानव समाजाची तशी आर्त हाक होती. छोटी राज्ये आपापले अस्तित्व टिकवण्याच्या प्रयत्नात असुरांना शरण जात होती. प्रतिकाराची भावना क्षीण होती. समुद्रापल्याड असलेल्या असूरी महाशक्तीचा प्रतिकार कसा करायचा, असे सारेच प्रश्न अनाकलनीय होते.

एका पहाटे महर्षी विश्वामित्र अयोध्येच्या राजदरबारात पोहोचले आणि श्रीरामाला घेऊनच अयोध्येच्या बाहेर पडले. विश्वामित्र म्हणजे एका अर्थाने साधनेचा, खडतर तपस्येचा मार्ग. ही साधना स्वतःसाठी नाही. जगातील प्राणिमात्रांच्या कल्याणाचा ध्यास त्यात आहे. विश्वाला दिशा दाखवणारे नेतृत्व त्यांच्याकडे आहे. त्यांचा विश्वास दुर्दम्य आहे. त्यांची निवड अचूकच ठरणार! पुढचे पाऊल समुद्रापलीकडे असलेल्या असूरशक्तीला आव्हान देणार आहे. या पावलासोबतच उमटणाऱ्या प्रतिध्वनींचा चीत्कार समग्र राष्ट्राच्या कानठळ्या बसवणार होता. यज्ञशाळा बेचिराख झालेल्या.. ऋषी–मुनींची कलेवरे पडलेली.. राक्षसी अत्याचारांना बळी पडलेली भयभीत जनता.. ओसाड पडलेल्या वस्त्या.. अवतीभवती अनाचार, अत्याचार माजलेला.. श्रीरामांनी हे वास्तव बघितले. ते संघर्षाला सिद्ध झाले. त्राटिका, मारीच, सुबाहू यांचा त्यांनी सहज वध केला. हे सोपे काम नव्हते. कोवळ्या राजकुमाराने असूशक्तीला दिलेले ते आव्हान होते. पृथ्वीवर बिनबोभाट वावरणाऱ्या दैत्यांना धडकी भरवणारे हे कृत्य प्रभू श्रीरामांनी सहजसाध्य केले होते. निशाचरांच्या संघटित उच्छादासमोर हतबल झालेल्या सज्जन शक्तीचे मनोबल उंचावणारा हा पहिला श्रीराम विजय होता.

साऱ्यांनी वाळीत टाकलेल्या, वंचित अहल्येला समाजात पुन्हा स्थान देणारा राम.. शबरीच्या उष्ट्या बोरांचा आस्वाद घेणारा राम.. आपल्या वनवासात निषाद, भिल्ल, वानर, गिद्ध यांसह सगळ्या लढवय्या जातीसमूहांना जन्मभूमीसाठी लढण्यास सिद्ध करणारा राम.. विविध भाषा, बोली, वेशभूषा, परंपरा या सर्वांचा सुवर्णमध्य

साधून सर्वांना शत्रूच्या सन्मुख उभे करणारा राम.. जगाच्या पाठीवर पहिल्यांदा समुद्र ओलांडून युद्ध करणारा राम.. केवळ सीतेच्या हरणामुळे हा संघर्ष उभा नाही झाला. उलट अधर्मावर धर्माचा विजय संपादन करण्यासाठी पहिला संघटित आणि सशक्त प्रयत्न झाला, म्हणून सीतेला या संकटाला सामोरे जावे लागले. प्रचंड शस्त्रसाठा आणि सैन्यदल असलेल्या कुंभकर्ण, मेघनाद, अहिरावण, महिरावण या महाबलवान राक्षसांशी युद्ध हे काही अतिंद्रिय शक्तीच्या आधारे नव्हते. याचसाठी श्रीराम चौदा वर्षे झटले होते. एकीकडे अफाट वैभवशाली आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रे असलेली सेना, तर दुसरीकडे मनात प्रतिशोधाची आग प्रज्वलित झालेला जनसमूह असा हा लढा होता. एकूणच असमतोल सामरिक स्थिती होती. ज्याचे नाव घेताच संपूर्ण धरा कापते, ज्याच्या भेदक दृष्टीनेच पृथ्वी आंदोळू लागते असा दानवांचा सम्राट रावण! या रावणाचा रथ प्रचंड त्वेषात, वेगाने येतो आहे.. शस्त्रांचा मुबलक साठा सोबत आहे.. या रथात लंकेचे वैभव प्रतिबिंबित होते आहे.. वनवासी श्रीरामाजवळ काय आहे? रथ आहे, तो धर्माचा! शौर्य आणि धैर्य ही या रथाची दोन चाके. सत्य आणि चारित्र्य या दोन गुणांची पताका या रथावर आहे. स्वअर्जित शक्ती, विवेकी वर्तन, मर्यादांची स्पष्टता आणि लोककल्याण अशा चार वैशिष्ट्यांचे अश्व श्रीरामाच्या रथाला जुंपले आहेत. समतेचा लगाम हाती आहे. भोवती लोकसेवेचे अभेद्य कवच आहे. एका क्षणी श्रीरामांचा बाण अचूक वेध घेतो अन् रावण जमिनीवर कोसळतो.. प्रभू श्रीरामांनी एक अभूतपूर्व विजय संपादन केलेला असतो!

या कसोटीच्या काळातही श्रीरामांनी मर्यादांचे तंतोतंत पालन केले. सुग्रीवाला राज्य परत मिळवून दिले. रावणाच्या जागी बिभीषणाचा राज्याभिषेक झाला. श्रीरामांना या सगळ्या सत्ता स्वतःकडे राखण्याचा मोह नाही. त्यांनी सज्जनशक्तीचे जागरण, संघटन आणि रक्षण केले. आपण रामलीला म्हणतो, ती अवतारी पुरुषाची चमत्कारी कथा नाही. ते यश आहे, एका आदर्श संघटकाचे, एका संकल्पाचे, प्रयत्नांच्या पराकाष्ठेचे आणि मानवी मूल्यांचे. असूरशक्ती संपवण्यासाठी संघटित समाजमनाने केलेल्या हुंकाराचे ते यश आहे. श्रीरामांनी पुत्र, पिता, पती, बंधू, राजा, शिष्य म्हणून आदर्श प्रस्थापित केले, म्हणूनच ते आपल्या राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहेत. आता पुन्हा अयोध्येत श्रीराम येत असताना आपल्या वर्तमानाला गरज



आहे, ती त्यांच्या ध्येयनिष्ठ जीवनातील आदर्शांची. आजही मारीच, शूर्पणखा, सुबाहू, त्राटिकासारख्या प्रवृत्ती डोकावल्या की गरज भासते ती त्यांच्या नि:पातासाठी सरसारवलेल्या युवा श्रीरामाची. देशापेक्षा स्वार्थ मोठा मानणारी रावण वृत्ती बळावताना दिसली की स्वयंसिद्ध श्रीरामाशिवाय पर्याय उरत नाही. व्यवस्था नियंत्रणाबाहेर गेल्या आणि प्रजा भयग्रस्त झाली की गरज भासते ती राजा श्रीरामांची. वंचितांच्या, पीडितांच्या आयुष्यात आणखी दुःख दाटू लागले की जणू समाजातील 'राम' हरवला आहे, असेच वाटू लागते.

अयोध्येतील श्रीराम प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने देशभरात जी एकात्म भावना निर्माण झाली आहे तिच्या बळावर राष्ट्रमंदिराचीही उभारणी होऊ शकते. त्यासाठी 'राष्ट्रभक्ती' हे एक असाधारण असे माध्यम आहे. ही राष्ट्रभक्ती जोपासतान काही अगदी साध्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला शोधावी लागतील. उदा. आपण सार्वजनिक स्वच्छतेचे भान ठेवतो का? वृक्षसंवर्धन करतो का? वीज, पाणी आणि अन्य स्रोत मर्यादित प्रमाणात वापरून राष्ट्रीय संपत्ती जपतो का? वाहतुकीचे नियम, सामाजिक वर्तनाचे संकेत पाळतो का? अशा अनेक गोष्टी मनाला विचाराव्या लागतील आणि त्याप्रमाणे स्वत:मध्ये बदलही घडवावे लागतील. राष्ट्रमंदिर निर्मितीच्या या वाटेवर भ्रष्टाचारमुक्त, समरस, संपन्न समाजासाठी मानसिक परिवर्तनाची तयारी तर अभिप्रेत आहेच, शिवाय श्रीरामाचे आदर्श समोर ठेवून व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तन-व्यवहारात सकारात्मक, सुनिश्चित, सातत्यपूर्ण बदलही अपेक्षित आहेत. तसे झाले तर आपल्याला स्वत:च्या अन् देशाच्याही प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर 'राम' गवसल्याशिवाय राहणार नाही! ■


# 'तेथे' मंदिरच होते

● डॉ. के. के. मोहम्मद

> मी मशिदीच्या खाली मंदिराचे अवशेष बघितले आहेत, हे अयोध्येच्या वस्तुस्थितीबाबतचे माझे विधान १५ डिसेंबर १९९० रोजी प्रकाशित झाले. तोपर्यंत दोन्ही बाजूंकडील इतिहासकार व पुरातत्त्व तज्ज्ञ यांच्यात तीव्र आरोप-प्रत्यारोप सुरू झाले होते.

**मी** चेन्नई येथे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणमध्ये उपअधीक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी इरावतम महादेवन (आयएएस) यांचा 'इंडियन एक्स्प्रेस'मधील एक लेख माझ्या वाचनात आला. त्यांनी सिंधू शिलालेखांबाबत बरेच लिखाण केले आहे आणि एक मान्यताप्राप्त विद्वान म्हणून त्यांची कीर्ती आहे. निवृत्तीनंतर ते प्रचंड खपाच्या दिनमणी या तमिळ वृत्तपत्राचे संपादक म्हणून काम बघायचे. त्यांनी लिहिले होते: खाली मंदिराचे अस्तित्व आहे याबाबत इतिहासकारांना अजूनही शंका असेल तर, ती शंका दूर करण्यासाठी पुन्हा एकदा उत्खनन व्हायला हवे. परंतु, एक ऐतिहासिक चूक दुरुस्त करण्यासाठी ऐतिहासिक वास्तू (बाबरी मशीद) पाडायलाच हवी, असे म्हणणे चूक आहे.

मी त्यांच्या समतोल मताचा आदर केला आणि त्यांची प्रशंसा करणारे पत्र लिहिले. त्यात मी उल्लेख केला की, १९७६-७७ साली तिथे ज्या चमूने उत्खनन केले, त्याचा मी सदस्य होतो. ''एका ऐतिहासिक चुकीच्या दुरुस्तीसाठी बदला म्हणून एखादे स्मारक उद्ध्वस्त करणे चूक आहे, हे तुमचे म्हणणे स्तुत्यच आहे. तुम्ही तुमचे उदार मत मांडले आहे.'' त्यांना पत्र मिळाले. लगेच ते तमिळनाडू सचिवालयाच्या क्लाईव्ह इमारतीतील माझ्या कार्यालयात आले. माझे पत्र प्रकाशित करण्याची ते परवानगी मागू लागले. ते म्हणाले, ''तुम्ही सरकारी नोकर असल्यामुळे सरकारच्या परवानगीशिवाय अशा संवेदनशील मुद्द्यावर



लिहिणे आत्महत्या करण्यासारखे आहे. तुमचे वरिष्ठ तुम्हाला परवानगी देणार नाही, हे निश्चित आहे. असे असले तरी सत्याला झाकून ठेवायला नको. योग्य तो निर्णय घ्या.''

आम्ही पुरातत्त्व अधीक्षक बी. नरसिंहय्या यांच्याशी चर्चा केली आणि ठरविले की, अशी महत्त्वाची माहिती झाकून ठेवणे योग्य नाही. प्रो. बी. बी. लाल यांच्या नेतृत्वात आम्ही विटांचा चबुतरा शोधून काढला होता, तेव्हा नरसिंहय्या हे महाअधीक्षक होते. परंतु आम्हाला कट्टरवादी हिंदुंच्या हातातील खेळणे व्हायचे नव्हते. सर्व प्रकारच्या जातीयवादी शक्तींपासून आम्हाला सारखे अंतर ठेवायचे होते. शेवटी, 'इंडियन एक्स्प्रेस'च्या सर्व आवृत्त्यांमध्ये 'संपादकांना पत्र' या सदरात माझे ते विधान प्रकाशित झाले. तद्वतच, ते इतर भाषेतील सर्व वृत्तपत्रांमध्येही आले. मला अनेक फोनकॉल्स आलेत- धमकविणारे आणि अभिनंदन करणारेही. परंतु, ठरविल्याप्रमाणे माझ्या भोवती जे काही चालले होते, त्यापासून मी स्वत:ला अलिप्त ठेवले. त्या काळात चेन्नईत आम्ही युनेस्को प्रायोजित सिल्क रूट परिषद आयोजित केली होती. के. टी. नरसिंहन आणि मी याचे आयोजक होतो. दिल्लीवरून संयुक्त संचालक (संस्कृती) आर. सी. त्रिपाठी आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणचे महासंचालक एम. सी. जोशी त्यात भाग घेण्यासाठी आले होते. परिषद उत्तम रीतीने पार पाडल्याबद्दल दोघांनीही माझे कौतुक केले. डॉ. जोशी म्हणाले, ''जर अलिगडचा तो प्राध्यापक इथे असता तर त्याला लाजीरवाणे झाले असते.'' ते डॉ. इरफान हबीबबाबत बोलत होते. डॉ. जोशींनी माझी वैयक्तिक माहितीदेखील डॉ.त्रिपाठींना दिली. त्यानंतर

डॉ. जोशी म्हणाले, ''आता आम्हाला तुमच्या प्रेस स्टेटमेंटबद्दल प्रश्न आहेत. सरकारच्या परवानगीशिवाय तुम्ही या अशा महत्त्वाच्या मुद्यांवर सार्वजनिक पत्रक कसे काय काढले? आम्ही तुम्हाला या क्षणी चौकशी प्रलंबित (पेंडिंग इक्वायरी) ठेवून निलंबित करीत आहोत.'' मी म्हणालो, ''सर, मला माहीत होते की, या अशा बाबतीत मला परवानगी मिळणार नाही. मी लोकहितास्तव खरे बोललो.'' मी त्यांना एक संस्कृत वचनही ऐकविले– 'लोकसंग्रामेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि।'

''तुम्ही मला शिकवता का? मी अलाहाबादचा ब्राह्मण आहे.'' त्रिपाठी ओरडले. पुढे म्हणाले, ''मी तुम्हाला आत्ताच्या आत्ता निलंबित करतो.'' मी शांतपणे म्हणालो, ''स्वधर्मे निधनं श्रेय:।'' (म्हणजे कर्तव्य करीत असताना अगदी मृत्यूदेखील श्रेयस्कर असतो.) त्रिपाठी शांत झाले व म्हणाले, ''मोहम्मद, तुमची ठाम भूमिका स्तुत्य आहे. परंतु, तुमच्यावर कारवाई करावी म्हणून वरून माझ्यावर दबाव आहे.'' मी म्हणालो, ''मला माहीत आहे सर, सर्व परिणामांचा पूर्ण विचार करूनच मी ते स्टेटमेंट जारी केले होते.'' तरीही जोशींचे काही समाधान होईना. ते म्हणाले, ''तुम्ही वृत्तपत्रात तुमचे नाव, पद, पत्ता का टाकले?'' मी म्हणालो, ''मी विचार केला की ते आवश्यक आहे. कारण, कुणी असा विचार करू नये की हा मोहम्मद कुणी क्षुल्लक व्यक्ती आहे.'' दुसऱ्या दिवशी महादेवन त्या दोघांना भेटले आणि त्यांनी माझा निलंबनाचा आदेश बदलवून माझी बदली चेन्नईहून गोव्याला केली.

६ डिसेंबर १९९२ रोजी गोव्यातील बॉम जेझस चर्चच्या रेक्टरशी चर्चा करीत होतो. याच चर्चमध्ये सेंट झेव्हियरचे पवित्र अवशेष ठेवले आहेत. तेवढ्यात बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्याची बातमी आली. त्याच्या पुढील वर्षी बाबरी उद्ध्वस्त करण्याच्या पहिल्या वर्धापनदिनी कट्टरपंथी हिंदू ओल्ड गोव्यातील चर्चेसवर हल्ला करतील, अशी भीती फादर रिगो यांनी बोलून दाखविली. आम्ही दोन चमू तयार केल्या. एका चमूने बॉम जेझस चर्चमध्ये फादर रिगो यांच्या नेतृत्वात मुक्काम ठोकला आणि दुसरी चमू माझ्या नेतृत्वात सेंट कॅथेड्रल आणि सेंट आसिसी येथे रात्रभर पहारा देत बसलो. भारतीय धर्मनिरपेक्षतेचा तो एक रोमांचक अनुभव होता. राष्ट्रीय स्मारकांच्या रक्षणासाठी मुस्लिम, हिंदू व ख्रिश्चन पहारा देत उभे होते. अयोध्येतील विध्वंसात जी अत्यंत महत्त्वाची शिल्पाकृती बाहेर आली, ती म्हणजे विष्णुहरि शिला. या शिलालेखावर ११-१२व्या शतकातील संस्कृतमध्ये नागरी लिपीत लिहिले होते की, हे मंदिर, ज्याने वाली व दशमुखीला (रावण) ठार केले, त्या विष्णूला (राम हा विष्णूचा अवतार आहे), समर्पित आहे. १९९२ साली डॉ. वाय. डी. शर्मा व डॉ. के. एम. श्रीवास्तव यांनी जेव्हा घटनास्थळाचे निरीक्षण केले तेव्हा त्यांना विष्णूचे अवतार, शिव, पार्वती इत्यादींच्या मातीच्या लहान लहान मूर्ती आढळल्या. या कुशाण काळातील (१०० ते ३०० इ. स.) होत्या. २००३ साली जेव्हा अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाने पुन्हा उत्खनन करण्यात आले तेव्हा मंदिराच्या स्तंभांना आधार देण्यासाठी निर्मित ५० हून अधिक विटांचे चबुतरे सापडले. साधारणत: मंदिराच्या शिखरावर असणारे 'अमलक' आणि अभिषेकाचे तीर्थ वाहून जाण्यासाठी असलेले 'मकर प्रणाली'देखील उत्खननात सापडले. बाबरी मशिदीच्या समोरील परिसर समतल केल्यानंतर मंदिराशी संबंधित २६३ शिल्पाकृती सापडल्याचा अहवाल उत्तरप्रदेशचे पुरातत्त्व संचालक डॉ. रागेश तिवारी यांनी सादर केला.

उत्खननात उघड झालेले पुरावे तसेच ऐतिहासिक शिल्पाकृतींचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण या निष्कर्षाप्रत आले की, बाबरी मशिदीच्या खाली एखादे मंदिर अस्तित्वात होते. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे लखनौ खंडपीठदेखील याच निष्कर्षावर पोहोचले. उत्खनन निष्पक्ष व्हावे म्हणून १३१ उत्खननकर्त्यांमध्ये ५२ मुस्लिमांना घेतले होते. एवढेच नाही, तर बाबरी मशीद कृती समितीच्या पुरातत्त्वीय इतिहासकार व प्रतिनिधींच्या (नामे सूरज भान, मंडल, सुप्रिया वर्मा व जया मेनन) उपस्थितीत उत्खनन करण्यात आले. उत्खनन याहून अधिक निष्पक्ष करता आले असते काय? उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही वामपंथी इतिहासकारांच्या कोलांटउड्या सुरूच होत्या. या आधीही त्यांनी आपल्या भूमिका बदलल्या होत्या आणि त्याची त्यांना खंतही नव्हती. या त्यांच्या सततच्या भूमिका बदलण्यामागचे कारण म्हणजे बाबरी मशीद कृती समितीचे प्रतिनिधी म्हणून जे त्या उत्खननाला उपस्थित होते ते फक्त इतिहासकार होते. **(भाग क्र.२)**

**श्री. मोहम्मद हे निवृत्त पुरातत्त्व संचालक (उत्तर भारत) आहेत.**

**(अनुवाद– विशाल फुटाणे)**

**नाशिक– उपस्थिती–** अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रीस मुल्तानी, नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री एजाज शेख, प्रदेश उपाध्यक्ष अकबर शाह, डॉ.उमेश काळे, नाशिक लोकसभेचे संयोजक फिरोज(राजू)शेख, जलील अन्सारी, मुजमिल सलीम मिर्झा, शाहिन मिर्झा, नाशिक महानगर अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्ष आरिफ अहमद काझी आदी.





**छत्रपती संभाजीनगर– उपस्थिती–** ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडे, अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रीस मुल्तानी, भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, शहराध्यक्ष शिरीश बोराळकर, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष एजाज देशमुख, प्रदेश चिटणीस शालिनी फुंदे, प्रदेश उपाध्यक्ष हाजी दौलत खान, हाकीम पहिलवान, वसीम भाई, जिल्हाध्यक्ष नबी पटेल, इलियास शहा, सलीम भाई आदी.

**मुंबई– बोहरा समाज आणि शिया समाजाच्या धर्मगुरूबरोबर चर्चा करून महाविजय २०२४ च्या विषयी विविध विषयांवर चर्चा– उपस्थिती–** अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष, इद्रीस मुल्तानी, जुनेद खान, वसीम खान, मुनावर पटेल, रिदा रशीद, अश्रफ वांकर, एजाज शेख, वीरू सिंग, सलीम बागवान, राहुल बजाज, सुलभा कांबळी, नवनीत कौर, हाजी अखिल, अफजल दाऊदानी आदी.





**पुणे– ख्रिश्चन समाज मेळावा– उपस्थिती–** केंद्रीय अल्पसंख्याक राज्यमंत्री जॉन बारला, भाजपा प्रदेश सरचिटणीस, संजय केनेकर, इद्रीस मुल्तानी, वसीम खान, सलीम जहांगीर, वीरू सिंग, मुश्ताक दळवी, रीदा रशीद, अन्वर पठाण, सलीम बागवान, दौलत खान, सलीम खान, राहुल बजाज, छाया भोसले, सुलभा कांबळी आदी.




**कल्याण-डोंबिवली- इंटरस्कुल फुटबॉल स्पर्धा- उपस्थिती-** मच्छिमार सेल प्रदेश अध्यक्ष ॲड. चेतन पाटील, कल्याण ग्रामीण युवा मोर्चा विधानसभा अध्यक्ष अमित चिकणकर, कल्याण ग्रामीण विधानसभा नमो चषक संयोजक संचिन गायकर, उत्तर भारतीय मोर्चा जिल्हाध्यक्ष नागेंद्र शर्मा, भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष सूर्यकांत मालकर, रवी ठाकूर, राजन पांडे, देवीशंकर शुक्ला, सारिका मिश्रा आदी.



**सोलापूर- नमो दौड- उपस्थिती-** माजी पालकमंत्री आ. विजय देशमुख, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, युवा मोर्चा प्रदेश सचिव गणेश साखरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष डॉ.किरण देशमुख, युवा मोर्चा जिल्हा प्रभारी ललिता जाधव, शहर सरचिटणीस पंकज काटकर, महिला मोर्चा अध्यक्ष विजया वड्डेपल्ली, अल्पसंख्यांक अध्यक्ष जाकीर सगरी, शहर उत्तर पूर्व मंडल अध्यक्ष प्रथमेश आनंदकर, माजी सभागृहनेते शिवानंद पाटील, जितेंद्र पवार, संजय कोळी, अविनाश पाटील, शंकर शिंदे, सोनाली मुटकिरी आदी.




**नाशिक- उपस्थिती-** आ. राहुल ढिकले, ज्येष्ठ नेते अरुण पवार, रंजना भानसी, नमो चषक संयोजक अमित घुगे, उद्धव निमसे, प्रियंका माने, राजेंद्र निकम, अशोक दुधारे, सागर शेलार, प्रविण भाटे, प्रशांत वाघ, राहुल कुलकर्णी, धनंजय माने, राहुल पवार, सोमनाथ वडजे, राजू थोरात, ज्ञानेश्वर काकड, एकनाथ पगार, रोहिणी दळवी, मंगला शिंदे, अनिता सोनवणे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License to Post without Prepayment,
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com